|| जय माता जी ||

|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : ६ | सोमवार दि. ०१ फेब्रुवारी २०२१ ते रविवार दि. ०७ फेब्रुवारी २०२१ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

मालकाने निरपराध नोकराला तुरूंगात सडवले मात्र सुटून येताच त्याने तिहेरी हत्याकांड घडवले

औरंगाबाद/क्राईम रिपोर्टर

एखाद्या निरपराध माणसावर अन्याय झाला आणि त्याने काहीही केलेले नसताना त्याला त्रास सहन करावा लागला कि त्या माणसाच्या मनात सुडाची भावना निर्माण होते आणि मग ज्याच्यामुळे त्याचे आयुष्य उध्वस्त झालेले असते त्याच्यावर तो असा काही सूड उघवतो कि संपूर्ण समाज आणि पोलीसही हादरून जातात. कारण सुडाची भावना जेवढी तीव्र असते. तेवढीच सुडाच्या भावनेतून केलेली कृती भयानक असते आणि हि कृती करणाऱ्याला मात्र त्याचा जराही पश्चाताप नसतो. उलट ज्याने आपल्याला बरबाद केले त्याच्या संपूर्ण कुटुंबाचा आपण सर्वनाश केल्याचे विकृत समाधान त्या माणसाच्या चेहऱ्यावर असते. अशावेळी त्याला त्याच्या जीवाची किंवा भवितव्याची जराही चिंता नसते. त्याला फक्त आणि फक्त समोरच्यावर सूड घ्यायचा असतो तेच त्याचे ध्येय असते. त्यामुळे त्याला परिणामाची जराही चिंता नसते.

पैठण येथील जुनेकावसान येथे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या माणसाच्या बाबतीत असेच घडले. एका फायनान्स कंपनीचे काम करणाऱ्या इसमाकडे वसुली एजंट म्हणून कामाला असलेल्या तरुणाला त्याचा कोणताही अपराध नसताना त्याच्या मालकाने एका गुन्ह्यात अडकवून तुरुंगात धाडले. त्यामुळे त्या तरुणाचे कुटुंब उध्वस्त झालं. आई-वडील सोडून गेले, भाऊ बेपत्ता झाला. ज्या मालकासाठी आपण जीवाचे रान केले त्याच्या कुटुंबाशी आणि इतर नातेवाईकांशी आपुलकीने वागलो त्यानेच आपल्याला असे उध्वस्त करावे याचा त्याला भयंकर राग आला आणि त्याच्या हृदयात सुडाची आग पेटली. आपला काहीही गुन्हा नसताना ज्याने आपल्याला उध्वस्त केले त्याच्या कुटुंबाचा सर्वनाश करायचा असे ठरवून तो एके रात्री मालकाच्या घरात घुसला आणि त्याने मालकासह त्याची पत्नी आणि दोन्ही मुलांवर चाकूने हल्ला केला. ...पान २ वर

बलात्कार करून तिचे आयुष्य नासवले पोलीस महिलेला वरिष्ठानेच फसवले!

मुंबई/राजेंद्र वेदांते

आजकाल महिलांना प्रतेक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन करियर करण्याची संधी मिळालेली असल्याने कधी काळी चूल आणि मुल या पुरतेच अस्तित्व असलेल्या महिला आज मात्र समाजाचा प्रमुख घटक बनलेल्या आहेत. शिक्षण आणि कर्तुत्वाच्या जोरावर महिलांनी सर्वच क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. मात्र एवढी झेप घेऊनही त्या असुरक्षित आहेत. कधी घरात तर कधी कामाच्या ठिकाणी वासनेची शिकार ठरत आहेत. वरिष्ठांकडून होणारे लैंगिक छळ हे तर आता नित्याचेच झालेय. अगदी ज्यांच्यावर समाजाच्या संरक्षणाची जबाबदारी आहे त्या पोलीस खात्यात सुद्धा महिला कर्मचारी सुरक्षित नाहीत.

भोईवाडा पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका सहा.महिला पोलीस निरीक्षकाचे सहा. आयुक्तांनीच आपण अविवाहित असल्याचे खोटे सांगून आणि लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक शोषण केले. या प्रकरणी पिडीत पोलीस अधिकारी महिलेच्या फिर्यादीवरून आरोपी पोलीस अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन पोलीस आयुक्तांनी दिले आहे. अगदी अलीकडेच मुंबईत पोलीस दलातील एका सहाय्यक पोलीस आयुक्तांवर (उझ) बलात्काराचा गुन्हा दाखल झाल्याने मुंबई पोलीस दलात खळबळ उडाली आहे. ३१ वर्षीय महिला सहाय्यक पोलीस निरीक्षकानेच मुंबई पोलीस आयुक्तांकडे याप्रकरणी तक्रार दाखल केली आहे. लग्नाच्या आमिषाने या अधिकार्याने आपल्यावर बलात्कार केल्याचा आरोप तक्रारदार महिलेने केला आहे. या घटनेमुळे पोलीस दलाला पुन्हा एकदा कलंक लागला आहे. याप्रकरणी उच्चपदस्थ पोलीस अधिकार्यांनी गंभीर दखल घेतली असून यात दोषी अधिकार्यावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस आयुक्त कार्यालयातुन सांगितले जाते. आरोपीची ज्युनिअर अधिकारी म्हणून तक्रारदार महिला कार्यरत होती. मुंबईत सहाय्यक पोलीस आयुक्तपदावर कार्यरत ...पान २ वर

वासनांध नराधमाच्या जाळ्यात फसली अब्रू वाचवताना ती जीव गमावून बसली

मयत रूपाली

आरोपी धनाजी

सांगली/क्राईम रिपोर्टर

पोर्न फिल्म बघून लैंगिक विकृतीने पछाडलेला माणूस प्रत्येक स्त्रीकडे एक शिकार म्हणून बघत असतो. स्त्री हि भोगदासी आहे असेच त्याला वाटत असते. त्यामुळे तो तिच्यावर हात टाकायलाही मागे पुढे पाहत नाही. सांगली जिल्ह्यातील देववाडी गावात अश्लील क्लिप बघून वासनांध बनलेला एक नराधम गावातल्या महिलांचा विनयभंग करीत असायचा. त्यामुळे संपूर्ण गाव त्याच्यावर चिडून होता. अनेक वेळा त्याने मारही खाल्ला. मात्र एकेदिवशी शेतात त्याने एका विवाहितेला गाठले आणि तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. मात्र तिने सर्व ताकदीनिशी पळून जाण्याचा प्रयत्न करताच त्या नराधमाने तिला विहिरीत फेकले आणि तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

सांगली जिल्हयातील शिराळा तालुक्यातील देववाडी येथे एका ३५ वर्षीय महिलेवरती लैंगिक विकृतीने पछाडलेल्या तरूणाने तिच्यावर आत्याचार करण्याचा प्रयत्न केला. त्यातून ती हाताला लागत नाही हे बघून त्याने त्या महिलेला जवळच्या विहिरीत ढकळून दिल्याची घटना घडली. ...पान २ वर

बाईच्या नादाने बाप झाला खूळा पोराचा जीव घेतला आवळून गळा

नाशिक/क्राईम रिपोर्टर

माणूस कधी कधी इतका स्वार्थी बनलेला असतो कि त्याला स्वतःच्या सुख पलीकडे काहीच दिसत नाही आणि बाईचे आकर्षण हे प्रत्येक पुरुषाला असतेच. मुलेबाळे असलेला एखादा विवाहित पुरुष जर दुसऱ्या बाईच्या मोहपाशात अडकला, तर मग त्याला आपल्या सासरचा आणि पोराबाळांचा सुद्धा विसर पडतो. पण जेंव्हा त्याची मुले मोठी होतात, तेंव्हा त्यांना मात्र बापाचे हे अवगुण सहन होत नाहीत आणि ते विरोध करू लागतात. नाशिकच्या देवला येथे पशुवैद्यकीय अधिकारी असलेल्या प्रभाकर माळवाड यांना तीन मुले असताना त्यांनी दुसऱ्या बाईबरोबर लग्न केले. इतकेच नव्हे तर तिच्या नावावर दीड एकर शेती केली. त्यामुळे त्यांचा मुलगा चिडला आणि त्यातून बाप लेकांत वाद सुरु झाला आणि याच वादातून प्रभाकर माळवाड यांनी आपल्या तरुण मुलाची गळा दाबून हत्या केली. एका बाईसाठी स्वतःच्या मुलाचा बळी घेणाऱ्या या बापाबद्दल देवला येथे संतापाची लाट उसळली असून पोलिसांनी आरोपी बापाला अटक केली आहे.

प्रभाकर नामदेव माळवाड हे पशु वैद्यकीय अधिकारी म्हणून सरकारी सेवेत रुजू झाले. नाशिक जिल्ह्यातील देवळा येथील पशुसंवर्धन दवाखान्याच्या ते सेवेत होते. सरकारी सेवेत आल्यानंतर साहजीकच त्यांना बऱ्यापैकी धनसंपदा लाभली. त्यापाठोपाठ समाजात मानसन्मान देखील लाभला. त्या बळावर त्यांचा सन १९८५ मध्ये ...पान २ वर

प्रियकरामुळे जीवन तिचे उध्वस्त झाले लग्नाचे आमिष दाखवून गर्भवती केले

अहमदपूर/फिरोज शेख

आजकाल शारीरिक आकर्षणातून तरुण तरुणी एकत्र येतात. अशावेळी बहकलेल्या तरुण प्रियकराच्या गोड गोड बोलण्याला आणि लग्नाच्या अमिषाला बळी पडून त्याला सर्वस्व देऊन मोकळ्या होतात आणि त्यातून गर्भधारणा झाली कि मग प्रियकर लग्नाचे वचन विसरतो आणि तिला जबरदस्तीने गर्भपात करायला लावतो. अहमदपूर तालुक्यातील चोबली येथे अशाच एका घटनेत एका तरुणाने गावातील तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून लग्नाचे वचन देऊन शरीर संबंध ठेवले व ती गर्भवती होताच जबरदस्तीने तिचा गर्भपात केला. या प्रकरणी त्या तरुणीच्या फिर्यादीवरून पोलिसांनी तिच्या प्रियकराच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून तो फरार आहे.

अहमदपुर तालुक्यातील एका तरूणीला त्याच गावात राहणाऱ्या तरूणाने लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर सहा महिण्यापासून वरंवार लैंगिक आत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दरम्यान या सहा महिन्याच्या कालावधीत दोन महिन्याची गरोदर असताना गोळ्या खाऊ घालून लहान बाळाचा पोटातच खुन केला असल्याचा खुलासा या तरूणीने केला आहे. ...पान ६ वर

समझोत्यासाठी बोलावून विरोधकांनी घात केला ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत प्रचार प्रमुख मेला

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर

आजकाल निवडणुका कोणत्याही असोत. त्या वेगवेगळ्या पक्षांमधील राडेबाजीमुळे रक्तरंजित होऊ लागल्या आहेत. प्रचारात एकमेकांच्या विरोधात बोलल्याच्या रागातून हाणामाऱ्या होऊन कार्यकर्त्यांचे मुद्दे पडायला लागलेत. नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत अशीच एक घटना घडली आहे. प्रचारात झालेल्या बाचाबाचीनंतर तोच राग मनात ठेऊन निवडणूक निकालाच्या दिवशी विजयी उमेदवाराच्या प्रचार प्रमुखाला मांडवलीसाठी बोलावून त्याची निर्घुणपणे हत्या करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून १३ जणांना अटक केली असून मुख्य आरोपी फरार झाला आहे. पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

निवडणूकीच्या राजकीय वादातून इचलकरंजी नजीकच्या कबनुर येथे शनिवार दि.२३ जानेवारी २०२१ रोजी संदीप मागाडे याचा तलवारीने आणि कोयत्याने वार करून निर्घृण खून करण्यात आला. अगोदरच कबनुर ग्रामपंचायतीची निवडणूक ही अतिशय संवेदनशील वातावरणात पार पडली. या पार्श्वभूमीवर गावात पोलीस प्रशासनाकडून चोख ...पान ६ वर

सुडामुळे भाचीने दिला नात्याला फाटा प्रियकराच्या मदतीने आत्येचा काढला काटा

संगमनेर/क्राईम रिपोर्टर

आजकालच्या मुलांना नात्यातील मोठ्या माणसांची कदरच राहिलेली नाही. कारण त्यांच्या आई-वडिलांकडून त्या मुलांवर चांगले संस्कारच झालेले नसतात. त्यामुळे मुले वाया जातात. कुणाचा हि आदर करीत नाहीत. आपल्या पेक्षा वयाने मोठ्या असलेल्यांना शिवीगाळ करणे, त्यांच्याशी उद्धटपणे बोलणे असे प्रकार सध्या घडू लागलेत. संगमेश्वर नजीकच्या कौथे कमलेश्वर येथील सावित्रीबाई शेळके यांचे तिच्या भाची बरोबर भांडण झाले होते. यावेळी सावित्रीबिनी तिला शिवीगाळ आणि मारहाण केली होती. त्याचा राग मनात ठेऊन तिच्या भाचीने आपल्या प्रियकराला सांगून आत्या सावित्रीबाई हिची हत्या केली. मात्र पोलिसांना कोणताही ठोस पुरावा नसताना अश्विनी आणि तिच्या प्रियकराला अटक केली.

१८ जानेवारी रोजी कौथे कमलेश्वर येथे एका वृद्ध महिलेचा मृतदेह सापडला होता तिच्या अंगावरील दागिने गायब होते त्यामुळे चोरीच्या उद्देशानेच हा खून करण्यात आला असावा असे पोलिसांना वाटत होते मात्र त्याच वेळी मयात सावित्रीबाई यांची भाची अश्विनी पंडित १९ हिची लव्ह स्टोरी समोर आली आणि अश्विनीचे तिची आत्या सावित्रीबाई हिच्या सोबत भांडण झाल्याचेही समजले ...पान ६ वर

खुनाचे रहस्य अजून नाही कळले सागरला ठार मारून कोणी जाळले

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

एखाद्या माणसाचा खून करून पोलिसांना चकवायचे असेल तर मृतदेहाची ओळख लपवणे गरजेचे असते. कारण जरी पोलिसांना मृतदेह मिळाला तरी जोवर मृतदेहाची ओळख पटत नाही, तोवर तपास पुढे सरकत नाही. त्यामुळे काही शातीर दिमाग आरोपी एखाद्याचा खून करताना पोलिसांना चकवण्यासाठी एकतर त्या मृतदेहाचे तुकडे करून वेगवेगळ्या ठिकाणी टाकतात किंवा तो मृतदेह जाळून तरी टाकतात. त्यामुळे पोलिसांचे मात्र काम वाढते. अर्थात पोलीस प्रयत्नांची शर्थ करून अशा केसेसचा पर्दाफाश करतात व आरोपीच्या मुसक्या आवळतात. सोलापूर जिल्ह्यातील हळाल्ली गावात अशाच एका तरुणाचा मृतदेह पोलिसांना सापडला आहे. त्याचा हि खून करून त्याला जाळून टाकण्यात आले होते. सुदैवाने त्याच्या वडिलांच्या फिर्यादीवरून त्या मृत तरुणाची ओळख पटली असून सागर सावगे असे मृत तरुणाचे नाव आहे. आता सागरला कोणी आणि कशासाठी मारले याचा पोलीस तपास करीत आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील हालहळ्ळी या गावात, सोलापूर येथील एका बावीस वर्षाचा युवकाचा अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून खून करून जाळून टाकल्याची घटना उघडकीस आली आहे. अज्ञात आरोपीविरुद्ध अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सिद्राम इरप्पा सावगे ...पान ६ वर

मित्राच्या पत्नीशी अनैतिक संबंध सुरु झाले अडथळा ठरणाऱ्या पतीला मित्रानेच ठार केले

भंडारा/क्राईम रिपोर्टर

आजकाल मित्र किती जरी जवळचा असला तरी त्याचा भरोसा नसतो. त्यामुळे मित्रांना सहसा घराचा उंबरठा ओलाडू देऊ नये. कारण काही मित्र नियत खराब असतात. मित्राच्या घरी जाऊन त्याच्या घरातल्या महिलांवर वाईट नजर ठेऊन मैत्रीला डाग लावतात. त्यातून मैत्री तर तुटतेच, पण कधी काळी मित्र असलेले दोघे नंतर मात्र एकमेकांचे वैरी होऊन एकमेकांच्या जीवावर उठतात आणि त्यातूनच एखाद्याचा जीव जातो.

भंडारा जिल्ह्यातील हिवरा येथे दोन मित्रांमध्ये मित्राच्या पत्नीवरून दुरावा आला आणि विवाहबाह्य ...पान ६ वर

पत्नीच्या नकारामुळे लागल्या कळा धारदार सुरीनेच तिचा चिरला गळा

छाया : बाळकृष्ण मोरे

डोंबिवली/श्रीराम कांदू

पती पत्नी मधील वाद हे नेहमीचेच असतात. कारण संसारात भांड्याला भांडे लागून त्याचा अधून मधून खणखणाट होतच असतो. अशावेळी हा वाद अधिक वाढणार नाही याची दोघांनीही काळजी घ्यायची असते. एकमेकांना सांभाळून घ्यायचे असते. पण काही वेळा रागाच्या भरात वाद वाडताच जातो आणि रागाला डोळे नसतात. अशावेळेस पतीच्या हातून काय घडेल याचा नेम नाही. डोंबिवलीच्या शेलार नाका परिसरात घडलेल्या अशाच एका घटनेत गावी जायची तिकीट काढलेली असताना पत्नीने ऐनवेळी गावी जाण्यास नकार दिल्याबद्दल एका चिडलेल्या पतीने रागाच्या भरात भाजी कापण्याच्या सुरीने तिचा गळा चिरून हत्या केली आणि स्वतःच्या मोबाईलवरून त्यानेच या घटनेची पोलिसांना माहिती दिली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. ...पान २ वर

01 TO 07 FEB 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 30/01/2021 9:37 PM Page 1

पान १ वरून....

मालकाने निरपराध नोकराला तुरुंगात ...

यात मालक त्याची पत्नी आणि मुलगी असे तिघे जागीच ठार झाले. सुदैवाने गंभीर जखमी झालेला मुलगा मात्र बचावला. या तिहेरी हत्याकांडाने संपूर्ण पैठण शहर हादरून गेले असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. पैठण शहरानजीक जुने कावसान येथे राजु उर्फ संभाजी निवारे रहात होते. ते फायनान्स कंपनीचे काम करायचे. ते त्यांची अश्विनी, मुलगी सायली, मुलगा सोहम असे हे चौकोनी कुटूंब होते. राजुकडे वसुलीचे काम होते. हे काम ते इमाने इतबारे करत होते. त्यांच्या या कामात मदतीसाठी त्यांनी अक्षय जाधव या तरुणास कामावर ठेवले होते. अक्षय देखील मेहनती होता. त्यामुळे त्याने काही दिवसातच राजु यांचा विश्वास संपादन केला होता. तो राजु यांचा इतका विश्वासू झाला की त्याचे त्यांच्या घरी जाणे-येणे वाढले. तो कधीही त्यांच्या घरी जात असे, त्यांच्या मुलांबरोबर खेळत असे. त्यांच्या पत्नीबरोबर गप्पा मारत असे. आता तो राजू यांच्या सर्व नातेवाईकांनाही माहित झाला होता. इतके ते एकमेकांशी जोडले गेले होते, पण हळूहळू अक्षयच्या वागण्यात बदल झाल्याचा संशय राजू यांना येऊ लागला. त्याचे वागणे बिनधास्त असले तरी त्यामागे काहीतरी संशयास्पद आहे असे त्यांना वाटू लागले. या संशयातून निवारे कुटुंबियांनी त्याच्याविरोधात ऑगस्ट २०१९ मधे गुन्हा दाखल केला. त्यामुळे त्याला अटक झाली. वास्तविक आपला काहीच दोष नव्हता, गुन्हा नव्हता, पण त्यांनी आपल्याविरोधात गुन्हा नोंद केल्याने आपल्याला अटक करण्यात आली अशी अक्षयची भावना झाली. त्याच्यावर गुन्हा दाखल झाल्याने त्याचा परिवार अस्वस्थ झाला. बदनामीच्या भीतीने त्या परिवारावर मोठे संकट आले. त्याचा भाऊ त्या घटनेनंतर बेपत्ता झाला, तर त्याचे आई-वडील जुने कावसान गाव सोडून पैठणला निघून गते. सव्या महिला हरसुल कारागृहात काढल्यानंतर त्याची सुटका झाली, पण या घटनेने तो उध्वस्त झाला होता. निवारे परिवाराने खोटी तक्रार दाखल करून आपली आणि आपल्या परिवाराची वाताहत केली. ते मात्र निवांत रहात आहेत याचा त्याला राग आला. भाऊ निघून गेला, आई-वडील दुरावल्याने तो मनातून तुटून गेला होता. तुरुंगातून सुटून आल्यानंतर तो आई-वडीलांना भेटला. त्याचवेळी त्याने सांगितले की, मी आता पुन्हा तुम्हाला भेटणार नाही. त्याच्या मनात केवळ सुडाची आग धगधगत होती. आपल्याला उध्वस्त करणाऱ्यांना जिवंत ठेवायचेच नाही असे त्याने मनाशी पक्के केले होते. तो इकडे-तिकडे भटकत दिवस उकलत होता. चोऱ्या करुन गरजेपूरता पैसा मिळवत होता. त्याने मोटरसायकल तसेच चोरीच्या पैशातून हत्यारे घेऊन ठेवली होती. कोणत्याही परिस्थितीत राजू उर्फ संभाजी नारायण निवारे याचा काटा काढायचाच असे मनोमन त्याने ठरवले होते, यासाठी त्याने पुरेपुर फिल्डिंगही लावली. त्याने केलेल्या प्लॅननुसार दि. २८ नोव्हेंबर २०२० च्या रात्री त्याने थेट पैठण शहरानजीकचे कावसान गाव गाठले. याच ठिकाणी राजू कुटुंबियांसमवेत रहातो याची अक्षयला पुर्णपणे माहिती होती. रात्री ११ वाजण्याच्या सुमारास परिसरही शांत झालेला होता. राजूच्या घरचेही गाढ झोपले होते. अक्षयने आजूबाजूचा अंदाज घेतला, सर्वत्र भयाण शांतता पसरली होती. तो दबक्या पावलांनी निवारे यांच्या घराजवळ गेला. हळूच त्याने घराची खिडकी उघडली आणि आत प्रवेश केला. त्याला घरातील सगळी माहिती होती, कारण तो वारंवार त्या घरात आला होता. त्यामुळे तो थेट बेडरूमच्या दिशेने निघाला, बेडरूममध्ये राजू गाढ झोपेत होते. ते शांतपणे झोपल्याचे पाहून अक्षयचे पित्त खवळले. त्याच्या रागाचा पारा चढला. याच माणसाने माझे आयुष्य बरबाद केले, माझ्या परिवाराची वाताहत केली आणि हा शांत झोपला आहे. याला आता सोडायचेच नाही असे मनातल्या मनात म्हणत त्याने राजू यांच्यावर हल्ला केला. झोपलेल्या राजू यांच्यावर त्याने धारदार शस्त्राने सपासप वार करण्यास सुरुवात केली. बेभान अक्षय अत्यंत निर्दयीपणे त्वेषाने वार करत होता, बेसावध असणाऱ्या राजू यांच्यावर अचानकपणे हल्ला झाल्याने ते स्वत:चा बचाव करू शकले नाहीत, त्यांच्या शरीरावर खोल जखमा झाल्या होत्या. रक्तबंबाळ अवस्थेतही ते अक्षयला विरोध करण्याचा प्रयत्न करू लागले. ते प्रत्युत्तर करू लागल्याने अक्षयचा क्रोध आणखीनच भडकला. तो आणखी त्वेषाने सपासप वार करू लागला. राजू रक्तबंबाळ होऊन कोसळले. या हाणामारीचा आवाज खोलीत घुमत होता. दुसऱ्या खोलीत झोपलेली राजूंची पत्नी अश्विनीने हा आवाज ऐकला तशी ती सावध झाली. नवऱ्याच्याच खोलीतून आवाज येतोय हे लक्षात येताच ती खोलीकडे धावली. खोलीतील दृश्य पाहून तिचा थरकाप उडाला. राजू रक्ताच्या थारोळ्यात निपचित पडला होता, तर त्यांच्याशेजारी रक्ताळलेला सुरा घेऊन अक्षय उभा होता. हे भयानक दृश्य पाहून ती जागच्या जागीच थिजली. तिच्या पाठोपाठ तिची मुलगी सायलीही आली होती. अवधी १ वर्षाची सायली अजून झोपेतून धड जागीही झाली नव्हती. तिला तिची आई परत खोलीत जा असे खुणावत होती, पण तिला ते काहीच कळले नाही. इतक्यात अक्षय अश्विनीसमोर येऊन उभा ठाकला. तिच्या तोंडातून शब्दही फुटत नव्हता. त्याने मागचा-पुढचा विचार न करता तिच्यावर सपासप वार केले. तसेच सायलीवरही त्याने त्याच चाकूने वार केले. त्या दोघीही रक्तबंबाळ होऊन जमिनीवर कोसळल्या. तिघे ठार झाले होते. आता सोहम एकटाच उरला होता, पण आवाजाने तोही आपसुकच अक्षयसमोर आला. त्याच्या चेहऱ्यावर क्रूर हसू उमटले. हातातला धारदार चाकू घेऊन तो सोहमवर चाल करून गेला. त्या सहा वर्षाच्या मुलावरही त्याने वार करण्यास सुरूवात केली. क्षणभरात सोहम निपचित होऊन कोसळला. या परिवारातील चौघांचाही खात्मा झाला, अक्षयचा बदला पूर्ण झाला. चौघांना ठार केल्याच्या असुरी आनंदात तो तिथून बाहेर पडला आणि पसार झाला, पण सोहम बेशुध्द पडला होता, तो काही वेळाने शुद्धीवर आला. त्याचा जीव बचावला होता. हत्याकांड केल्यानंतर अक्षय फरार झाला. त्याच्या शोधासाठी तब्बल ३५ दिवस पोलिसांनी राज्यभर पथके पाठवून तपास केला, मात्र त्याचा मागमूस लागत नव्हता, अक्षय वारंवार जागा बदलत होता, मोबाईल बंद ठेवत होता, त्यामुळे त्याचा नेमका ठावठिकाणा पोलिसांना कळत नव्हता. जानेवारीच्या सुरुवातीला अक्षयकडील पैसे संपल्याने मोटरसायकलमध्ये पेट्रोल कसे भरावे या विचारात तो होता. तो अंदरसूल (ता. येवला) येथील एका पेट्रोल पंपावर आला, तेव्हा त्याने पैशासाठी मित्राला फोन करण्याचे ठरवले. त्याने कर्मचाऱ्याच्या फोनवरून एका मित्राला फोन केला. मला पेटीएमने पैसे पाठव असे त्याने मित्राला सांगितले. दरम्यान ही माहिती पोलीस निरीक्षक भागवत फुंदे यांना दि. ६ जानेवारी रोजी त्यांच्या गोपनीय बातमीदाराकडून मिळाली. संशयित अक्षय हा एका विना क्रमांकाच्या मोटरसायकलने येवला येथून औरंगाबादकडे येत आहे. ही माहिती खात्रीलायक असल्याने पोलिसांनी तातडीने हालचाली सुरू केल्या. येवला, कोपरगांव, वैजापूर, विरगांव, गंगापूर, शिल्लेगांव, शिऊर व देवगांव रंगारी परिसरात नाकाबंदी करण्यात आली. तसेच अक्षयच्या मित्रास ताब्यात घेतले. त्यामुळे अक्षयचे लोकेशन पोलिसांना मिळाले व त्याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत अक्षयने जुन्या वादातून तिघांची हत्या केल्याची कबुली दिली. अक्षय प्रकाश जाधव (२७) याच्यावर राजू उर्फ संभाजी नारायण निवारे (३५) त्यांची पत्नी अश्विनी (३०), मुलगी सायली (९)या तिघांच्या खून केल्याप्रकरणी पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नं. ३३१/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३०२, ३०७, ४५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

बलात्कार करून तिचे आयुष्य...

असताना आरोपी अधिकारी व तक्रारदार महिला अधिकारी यांचे सुत जुळले होते. त्यानंतर यांचे संबध निर्माण झाले होते. कालांतराने तक्रारदार महिला अधिकारीला हा अधिकारी टाळाटाळ करू लागल्यानंतर या महिला पोलीस अधिकारीने आपल्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा दावा महिलेने केला आहे. आरोपी अधिकाऱ्याविरोधात कलम ३७६, ३५४ ड, ३५४ अंतर्गत मुंबईत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सध्या याप्रकरणाची कसून चौकशी चालू असल्याचे सांगितले जाते. लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केल्याचा आरोप तिने तक्रारीत केला आहे. जानेवारी ते ऑगस्ट २०१९ या काळात हा प्रकार घडल्याचा आरोप तक्रारदार महिलेने केला आहे. आरोपीने आपण विवाहित असल्याची माहिती आपल्यापासून लपवली होती. आपण अविवाहित असल्याचे सांगून त्याने लग्नाचे आमिष दाखवले आणि शारीरिक संबंध प्रस्थापित केले, असा दावा महिलेने केला आहे. लग्नाच्या भूलथापांना फसून त्यावेळी विवाहित असलेल्या तक्रारदार महिलेने पतीपासून घटस्फोट घेतला. आरोपीने अचानक टाळाटाळ करण्यास सुरुवात केल्याने तक्रारदार महिलेने अधिक चौकशी केली, तेव्हा त्याची बनवाबनवी उघडकीस आली. आरोपी पोलीस हा विवाहित असल्याचं पितळ तिच्यासमोर उघडं पडलं. आरोपी सहाय्यक पोलीस आयुक्ताला अद्याप अटक झालेली नाही, त्याच्यावर विभागांतर्गत चौकशीही बसवण्यात आलेली नाही. मुंबई पोलीसांच्या प्रतिमेला धक्का देणारी घटना भोईवाडा पोलीस ठाण्यात उघडकीस आले आहे. ऐका पोलीस अंमलदाराने महिला पोलीस अंमलदारावर बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेतही आरोपी पोलीस अंमलदाराने महिला पोलीस अंमलदाराला लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केला असल्याची तक्रार त्या महिला पोलीस अंमलदाराने भोईवाडा पोलीस ठाण्यात केली आहे. तक्रारदार महिला पोलीस अंमलदाराने दिलेल्या तक्रारीनुसार २०१५ पासून हा पोलीस अंमलदार तक्रारदार महिला पोलीसाला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर बलात्कार करीत होता. आपण अविवाहित असल्याचे त्याने पिडीत महिला पोलीसाला सांगितले होते. परंतु तो अलिकडे पिडीत महिला पोलीसाला भेटण्यास व लग्न करण्यास टाळाटाळ करत होता. तेंव्हा पिडीत महिलेने याबाबत अधिक चौकशी केली असता तो विवाहित असल्याचे समोर आले. याचा जाब त्याला विचारला असता त्याने पिडीत महिला पोलीस अंमलदाराला उडवाउडवीची उत्तरे देत पिडीताला माराहाण केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पिडीताने भोईवाडा पोलीस ठाण्यात संशयित आरोपी विरूद्ध तक्रार दाखल केली.

पत्नीच्या नकारामुळे लागल्या कळा...

मूळ गावी जाण्यास पत्नीने नकार दिल्याच्या रागातून पतीने तिची भाजी कापण्याच्या सुरीने राहत्या घरातच गळा चिरून हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. खळबळजनक बाब म्हणजे पत्नीची हत्या करून स्वतःच्या मोबाईलवरून कॉल करून पोलिसांना हत्या केल्याची माहितीही आरोपी पतीने दिली आहे. हा प्रकार डोंबिवली पूर्वेकडील शेलार नाक्यावर असलेल्या हरी म्हात्रे चाळीतील एका खोलीत घडली आहे. याप्रकरणी टिळकनगर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपी पतीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. शिवकुमार सरजु यादव (४१) असे बेड्या ठोकलेल्या आरोपी पतीचं नाव आहे. तर मिनिषा असे हत्या झालेल्या पत्नीचे नाव आहे. पोलीस उप निरीक्षक अजिंक्य धोंडे टिळकनगर पोलीस ठाण्यात कार्यरत असताना शुक्रवारी दुपारी ११ वाजल्याच्या सुमारास त्यांना पोलीस ठाण्याच्या फोनवर एका मोबाईल फोन आला होता. त्यावेळी समोरील फोनवरून मै शिवकुमार कोयलावाला बोल रहा हु । मैंने मेरी औरतका गला काट डाला । मै इधरही हु, जल्दी आओ । असे सांगितले. त्यानंतर त्यास कहाँ रहता है असे विचारता, त्याने मै शेलार नाका, शिल्पा बारके पिछे रहेता हु । असे सांगितले. नंतर त्यांनी पोलीस ठाण्यातील वरिष्ठांना माहीती देताच एक पोलीस पथक शेलारनाका भागातील हरी म्हात्रे चाळ, येथे गेल्यावर आरोपी शिवकुमार यादव याचे घर मिळाले. मात्र घराच्या रूमला लोखंडी ग्रिलला टाळा लावलेला दिसला व खोलीत एक व्यक्ती खुर्चीवर बसलेला व त्याचे समोर जमीनीवर एका महीलेच्या तोडावर चौकडीचा कपडा टाकुन महीलेचे तोंड झाकलेले दिसले व डोक्याखालुन भरपुर प्रमाणात जमीनीवर रक्त स्राव झालेला पोलीस पथकाला दिसून आला. तसेच मीच टिळकनगर पोलीस ठाण्यात फोन केला असल्याचे आरोपीने सांगितले. आरोपी शिवकुमारला त्याच्या गावी पत्नीला घेऊन जायचे होते. मात्र ती नकार देत होती. पत्नी काहीकेल्या यायला तयार होत नव्हती. त्यावरून दोघांमध्ये भांडण झाले. पतीने किचन रूममधील भाजी कापण्याच्या सुरीने तिचा गळा चिरला. धक्कादायक बाब म्हणजे घटनेच्या वेळी खुन्याचा लहान मुलगा सुदर्शन घरीच होता. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक अजिंक्य धोंडे यांच्या तक्रारीवरून हत्येचा गुन्हा नोंदवून आरोपी पतीला अटक केली. पोलिसांनी हत्येसाठी वापरलेला चाकूही हस्तगत केला आहे. शनिवारी खुन्याला कल्याण कोर्टात हजर करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

वासनांध नराधमाच्या जाळ्यात फसली...

दि.२१ जानेवारी २०२१ रोजी दुपारच्या सुमारास ही घटना घडली. देववाडीत या घटनेने एकच संतापाची लाट उसळली. त्याचे पडसाद शिराळा तालुक्यासह सांगली जिल्हयात ही उमटले. संशयीत आरोपीला पोलीसांनी पकडून नेले. तरीही या घटनेची तीव्रता काही कमी झाली नाही. त्याला कारण ही तसेच होते.तो तरूण त्या गावात लैंगिक विकृतीने पछाडलेला म्हणूनच आळखला जात होता.त्यातूनच ही घटना घडल्याने जनमाणसात उद्रेक होणे स्वाभाविक होते.रूपाली खोत असे त्या दुर्देवी महिलेचे नाव तर निवास खोत असे आरोपीचे नाव होते.रूपाली ही घटनेच्या दिवशी आपल्या शेतात ऊसाला पाणी पाजणेसाठी म्हणून गेल्या होत्या.त्यावेळी त्या एकटी असल्याचीसंधी साधून निवास याने तिच्या अंगाशी जात लैंगिक चाळा केला.ती पळून जात असताना त्याने तिला विहिरीत ढकलून दिले. शिराळा तालुक्यातील देववाडी गाव हे तसे जेम तेम लोकवस्तीचे गाव आहे येथे खोत लोकांची वस्ती ही तशी जास्तच आहे. याच गावात निवास उर्फ धनाजी खोत हा २० वर्षीय तरूण आपल्या आई वडिलासह राहयला आहे.तो शिराळा येथे आय.टी.आयच्या पहिल्या वर्गात शिक्षण घेत होता. तो चांगला सुशिक्षित असल्याने त्याच्याकडे सुरूवातीला लोक ही चांगल्या नजरेने बघत होते. परंतु गेल्या एक दोन वर्षापासून निवास हा लैंगिक विकृतीने ग्रासलेला होता. त्याला पॉर्नो फिल्म बघण्याचा नाद लागलेला होता. तो आपल्या मोबाईलमध्ये सारखे पॉर्नो फिल्म बघत होता. त्यातूनच त्याने आतापर्यंत गावातील अठरा ते वीस महिलांची तरूणींची छेड काढल्याची घटना घडली होती.या घटनेत त्याने गावातील लोकांचा तेवढाच मार ही खाल्ला होता.बऱ्याचवेळेला त्याला गावातील लोकांनी समाजावून ही सांगितले परंतू त्याच्या वागण्यात कोणताच कसलाही बदल झाला नाही.उलट तो दिवसे दिवस बिघडत चालला होता.त्याच्या लैंगिक विकृतीबद्दल गावातील महिलांना ही माहिती असल्याने त्यांनी ही त्याला याबाबत समज देवून वाटेला येवू नकोस असे बजावले होते.त्या महिलांचा ही त्याने बऱ्याच वेळेला मार ही खाल्ला होता. गावातील एखाद्या देखण्या विवाहितेला बघून त्याची लैंगिक भावना अधिकच तीव्र होत होती.तो त्याच्याकडे बघून अश्लिल चाळे करायचा. तर कधी त्याच्या कलत न कळत अंगचटीला जात होता.वयाची २० शी गाठलेला निवासला मात्र त्या महिलांच्याकडे बघून आपली लैंगिक भावना शमवावी असे वाटत होते.म्हणूनच तो गावातील एकटया दुकटया महिलेला गाठून त्याच्याशी गैरवर्तन करीत असायचा. त्याच्या या वाईट सवयीला त्याचे घरचे लोक ही वैतागलेले होते. बऱ्याचवेळेला त्याने एखाद्या माहिलेची छेड काढली. तिच्याशी लऐगिक गैरवर्तन केले तर ती भांडणे त्याच्या घरापर्यत येत होती. त्यामुळे त्याच्या घरच्या लोकांची मान ही शरमेने खाली जात होती. त्याच्या घरच्या लोकांनी ही त्याला याबाबत समजावून सांगितले होते. तरी ही त्याच्यात काहीच फरक पडलेला नव्हता.ते तरी त्याला किती वेळा समजावून सांगणार होते. तो काही आता लहान राहिला नव्हता. आयटीआयचे शिक्षण घेत असल्याने त्याला चांगल्या वाईटाचा अनुभव होता, मात्र लैंगिक भावना उद्दीपीत झाली की तो सैरभैर होत होता. त्यातूनच त्याने अनेकदा बऱ्याच महिलांची छेडछाड काढून त्याच्यावरती बलात्काराचा प्रयत्न केलेला होता.त्याची लैंगिक विकृती दिवसे दिवस वाढतच होती. देववाडी गावातच मारूती आनंदा खोत हे आपली पत्नी रूपाली मुले मुलगा अविनाश, मुलगी संजिता यांचेसह राहयला आहेत. त्याची थोडी फार शेतजमीन आहे.त्यावरच ते आपल्या कुंटूंबाचा उदरनिर्वाह करीत होते. शेतीबरोबर ते टॅक्टर ही चालवित होते. त्याचा मुलगा अविनाश हा इयत्ता दहावीत तर मुलगी आठवित शिकते. तसा त्याचा परिवार हा सुखी आणि समाधानी होता. त्याची पत्नी रूपाली ही त्याना शेतीकामात मदत करीत होती. मागे एकदा रूपालीची छेडछाड ही निवास खोत याने काढलेली होती. त्यावेळी रूपालीचा नवरा मारूती खोत व त्यांच्या अन्य नातेवाईकांनी निवास खोत याला मारहाण करून समजावून सांगितले. याचा राग निवास याला आलेला होता. त्यामुळे तो रूपालीवर चिडून होता. तिला बघून तो लैंगिक विकृती चाळवित होता. कधी एकदा हिला आपल्या अंगाखाली घेऊन लोळवतो असे झाले होते. तशी रूपाली ही सालस आणि शांत स्वभावाची होती. ती कधी कोणाच्या अध्यात मध्यात राहत नव्हती. आपले काम भले आपला संसार मुले बाळे भले यात ती समाधानी होती. परंतू निवासच्या मनात तिच्याविषयी लैंगिक भावना निर्माण झाल्याने तो तिच्यावरती डोळा ठेवून होता. कधी एकदा ही एकटी सापडते आणि आपण तिचा फायदा घेतो असे त्याला झाले होते. त्यातच दि.२१ जानेवारी रोजी रूपालीचा नवरा टॅक्टर घेऊन वारणानगर येथील येडीगेडे येथे गेला होता. तर मुलगा अविनाश हा त्याच्यासाठी चप्पल आणतो म्हणून शिराळ्याला गेला होता. त्यामुळे ती घरी एकटीच होती. म्हणून दुपारी २.०० वाजण्याच्या सुमारास शेतातील ऊसाला पाणी पाजणेसाठी जाण्याचे ठरविले. ती शेताकडे जात असताना प्रत्येक वेळी तिचा मुलगा किंवा अन्य कुणी तरी सोबती म्हणून जात होते. आतामात्र कुणीच तिच्याबरोबर गेले नव्हते. ती एकटीच दुपारच्या वेळी शेतात गेली होती. जाताना तिने शेजाऱ्याना अविनाश घरी आला तर त्याला शेतात पाठवून दया असा निरोप दिला होता. कारण पाणी देण्यासाठी त्या दिवशी दुपारीच लाईन येणार असल्याने तिची गडबड वाढली होती.आातच ती शेतात येऊन तिने लाईन चालू करून पाणी पाजवण्यास सुरूवात केली.काही वेळातच लाईन गेल्यावर ती आपल्या विहिरीजवळ जावून बसली होती. त्यावेळी तिच्या मोबाईलवरती तिच्या बहिणीचा फोन आल्याने ती तिच्याशी फानवर बोलण्यात गुंग होती. एवढयात शेतात रूपाली ही एकटीच गेली असल्याची माहिती निवासला लागली होती. तो संधीच्या शोधातच होता. म्हणून तिला काहीही समजण्याच्या अगोदर गुपचुपपणे तिच्या मागे जावून थांबला. तेथे त्याने तिला न कळता आपल्या अंगावरील शर्ट काढला आणि पॅन्ट ही काढली. तिला बघून त्याची लैंगिक भावना उद्दीपीत झाल्याने त्याने तिला हळूच पाठीमागून रूपालीला मिठी मारली. ती फोनवर बोलत असताना तिला कुणी तरी मिठी मारल्याने ती दबकून जागची हालली. तिने पाठीमागे वळून बघितले तर निवास हा अर्धनग्न होता. तिने त्याच्या मनातील कावा ओळखला आणि ती जोर जोराने ओरडू लागली. त्याच्या मनात वासनेचा आगडोंब उसल्याने तो तिच्याशी लगट करू लागताच ती पळू लागली होती. त्यावेळी त्याने तिच्या साडीला हात घातला. तशी ती साडीफेडून ऊसाच्या शेताततून मला वाचवा मला वाचवा अशी ओरडत पळू लागली. तेवढयात त्याने तिला गाढत खाली पाडले. आणि तो तिच्या अंगावर स्वार झाला. तिने ही त्याला बाजूला ढकलून देत परत पळू लागली परंतू जाताना तिला ठेच लागली. तिच्या अंगावर फक्त परकर आणि ब्लाऊज होता. दोघाात झटापट चालली होती. तो तिला सोडत नव्हता. सारखा मिठी मारण्याचा प्रयत्न करीत होता. तिचे चप्पल, एकीकडे मोबाईल दुसरीकडे पडला होता. तिच्या हातातील बांगडया ही फुटल्या होत्या. ती अर्धमेली झाली होती. ती त्याला तू पुढे आलास तर मी जीव देईन अशी धमकी देत होती. परंतू त्याच्या डोळ्यावर वासनेचा पडदा असल्याने तो बेभान झालेला होता. आता हिला सोडले तर आपले काहीच खरे नाही हे त्याने ओळखले होते. म्हणून तो परत तिच्याशी झोबांझोबी करत असताना कळत नकळतपणे ते विहिरीजवळ आले होते. त्यावेळी त्याने ती अंगाला हात लावू देईना म्हणून पाठीमागचा पुढचा विचार न करता तिला विहिरीत ढकलून दिले. ती पाण्यात पडल्यावर गंडागळ्या खात होती. पण तो तेथेच अर्धनग्न होता. एवढयात तिला शोधायला तिचा मुलगा अविनाश हा शेतात आला होता. विहिरीच्या जवळ फुटलेल्या बांगडया आणि चप्पला पडलेल्या बघून तो ही अर्धमेला झाला. समोर निवास हा अर्धनग्न अवस्थेत उभा असल्याने तो ओरडतच गावात आला. त्याने घडलेली घटना शेजाऱ्याना सांगितली. तेवढयात वारणा नगरला ट्रॅक्टर घेऊन गेलेले त्याचे वडिल ही आले. त्यांना ही अविनाशने ही घटना सांगताच सगळे गावकरी आणि ते शेतातील विहिरीजवळ आले होते. विहिरीजवळ रूपालीच्या फुटलेल्या बांगडया, मोबाईल आणि चप्पला होत्या. तिचा पाण्यात बडून लगेच मृत्यू झाला होता. कुणीतरी ही घटना शिराळा पोलीसांना फोनवरून सांगितली होती.ही माहिती मिळताच शिराळा पोलीस ठाण्याचे सपोनि विशाल पाटील हे आपल्या सहकार्यासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ही घटनेची माहिती घेऊन घटनास्थळाचा पंचनामा केला. गावकऱ्याच्या मदतीने त्यांनी विहिरीत तरंगंत असलेला रूपालीचा मृतदेह बाहेर काढला. या घटनेची माहिती जिल्हा पोलीस अधिक्षकदिक्षित गेडाम आणि डीवायएसपी. कृष्णांत पिंगळे यांना देण्यात आली. ते ही या घटनेची माहिती मिळताच तातडीने घटनास्थळी दाखल होऊन तपासाच्या दृष्टीने पोलीसांना योग्य त्या सुचना केल्या आणि या घटनेतील संशयीत आरोपीला लवकरात लवकर जेरंबद कण्याचे आदेश दिले.पोलीसांनी मयताचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेनंतर संशयीत आरोपी निवास खोत हा घटनेनंतर घटनास्थळावरून पळून गेला होता. या घटनेची माहिती ग्रामस्थांना समजातच ते अधिक आक्रमक झाले होते.या घटनेतील संशयीत आरोपीला आमच्या ताब्यात दया अशी त्यांनी मागणी लावून धरली होती. त्यासाठी त्यांनी शिराळा पोलीस ठाण्यावर कॅन्डल मोर्चा ही काढला होता. पोलीसांनी आक्रमक ग्रामस्थांना शांत करून आरोपीला जास्ती जास्त शिक्षा होईल याचा विश्वास दिला. या घटनेबाबत शिराळा तहसिलदार कचेरीवर ही ग्रामस्थांनी मोर्चा काढीत या घटनेचा निषेध नोंदविला होता. या घटनेची लेखी फिर्याद मयत रूपालीचे पती मारूती आनंदा खोत (वय ३९ रा.देववाडी, शिराळा) यांनी शिराळा पोलीस ठाण्यात दिल्यावर पोलीसांनी या घटनेतील आरोपी निवास खोत याला त्याच्या देववाडी येथील राहत्या घरातून ताब्यात घेतले होते. रूपाली मारूती खोत (वय ३५ .रा.देववाडी) हिच्या खून प्रकरणी पोलीसांनी निवास ऊर्फ धनाजी खोत (वय२०. रा. देववाडी) याच्या विरोधात गु.रजि.नं.१३/२०२१ भा.दं.वी.कलम ३०२,३५४, (ब) आणि ५०६ अशा कलमाखाली अटक केले. त्याला पोलीसांनी रूपाली खोत हिच्या खूनाविषयी विचारले असता तो आपला गुन्हा कबुल करीत नव्हता. परंतू त्याला मयात रूपालीचा मुलगा अविनाश याने शेतात अर्धनग्न अवस्थेत बघितल्याने त्याने त्याची ओळख पटविलेली होती. पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखवताच त्याने आपला गुन्हा कबुल केला.दि.२२ जानेवारी रोजी पोलीसांनी निवास याला शिराळा येथील कोर्टात उभे केले असता. मा.कोर्टाने त्याला सहा दिवसाची पोलीस कोंठी सुनावली होती.एका विवाहितेवर लैंगिक विकृतीने पछाडलेल्या युवकाने बलात्कार करण्याचा प्रयत्न केला आणि त्यासाठी तिचा जीव घेतला मुळात ही घटनाच लाजिरवाणी अशी आहे.या घटनेचे पडसाद शिराळा तालुक्यासह सांगली जिल्हयात महाराष्ट्रात उमटले होते. संशयीत आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी म्हणून या खटल्यात सरकारी वकिल म्हणून उज्जवल निकम यांनी काम पाहावे आणि आरोपीला फाशीची शिक्षा होणेसाठी प्रयत्न करावेत अशी मागणी होऊ लागली होती. या घटनेचा तपास स.पो नी.विशाल पाटील,यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.निरी. अविनाश वाडेकर, पो.नाईक शरद पाटील, विनोद पाटील अरूण कानडे, गणेश झांजरे, शिवाजी पाटील यांनी केला. लैंगिक विकृतीने पछाडलेली व्यक्ती ही आपल्या वासनापुर्तीसाठी कोणत्याही थराला जावू शकतो हेच या घटनेवरून दिसून येते.

बाईच्या नादाने बाप झाला खूळा...

विवाह झाला. त्यांचे वैवाहीक जिवन सुरळीत सुरु होते. धनसंपदा खुळखुळत असल्यामुळे त्यांचा पाय हळूहळू घसरु लागला. लग्नानंतर तिन वर्षानी सन १९८८मध्ये ते एका महिलेच्या प्रेमात पडले. फक्त प्रेमातच पडले नाही तर त्यांनी तिच्यासोबत विवाहबाह्य देखील संबंध प्रस्थापीत केले. पहिल्या पत्नीपासून त्यांना दोन मुली व एक मुलगा अशी तिने अपत्ये झाली होती. कालांतराने त्यांच्या दोन्ही मुलींची लग्ने झाली व त्या सुखाने नांदण्यास सासरी गेल्या. त्यांचा मुलगा काळानुरुप मोठा झाला. त्याला आपल्या वडीलांचे कारनामे समजू लागले. आपल्या पित्याचे त्या महिलेसोबत असलेले प्रेमसंबंध त्याला अजिबात आवडत नव्हते. त्यातून घरात तो चिडचिड करत होता. प्रभाकर माळवाड यांनी आपल्या नावावर असलेली दिड एकर शेती त्या महिलेच्या नावावर केल्याचे त्यांचा मुलगा निलेश यास समजले. त्यामुळे तो घरात वडील प्रभाकर माळवाड यांच्यावर जास्तच चिडचिड करु लागला. दोन्ही बाप बेट्यामधे सुरु असलेल्या भानगडीमुळे घरातील वातावरण दुषित होण्यास वेळ लागत नव्हता. तु माझ्या व तिच्या अर्थात त्या महिलेच्या आड येवू नकोस. तु आमच्यामधे आला तर तुला बघूनच घेईन अशी धमकी प्रभाकर माळवाड मुलगा निलेश यास देऊ लागले. त्या महिलेमुळे घरातील वातावरण दुषीत होत असले तरी देखील प्रभाकर माळवाड तिचा नाद सोडण्यास तयार नव्हते. त्यामुळे निलेश त्याच्या आईकडे त्याचे गाऱ्हाणे घेवून जात होता. दिड एकर शेती प्रभाकर माळवाड यांनी त्या महिलेच्या नावावर केली आणि वादाला सुरुवात झाली होती. बाप बेट्यामधील वादाचा शेती हा मुख्य विषय होता. मी तुला बघूनच घेईन ही धमकी बापाकडून निलेशला नेहमीच मिळत होती. निलेश त्याच्या आईकडे त्याचे गाऱ्हाणे मांडत असला तरी ती माऊली बिचारी नवऱ्याला समजावण्याचा प्रयत्न करत होती. मात्र घरचा धनी असलेल्या प्रभाकरच्या मनी ती महिला ठाण मांडून बसली होती. निलेश सध्या बेरोजगार होता. या दुनियेत कामधंदा शोधणे हे देखील एकप्रकारे कामच असते. त्यामुळे तो कामधंदा शोधण्याचे काम करत होता. मुलगा निलेशने त्या महिलेचा व तिला दिलेल्या दिड एकर शेतीचा वाद सुरु केला म्हणजे बाप प्रभाकर त्याला तु काहीच कामधंदा करत नाही असा विषय उकरुन काढत होते. दोन्ही जण आपापले वादाचे विषय सोबतच बाळगत होते. दोघांचेही प्रश्न सध्याच्या घडीला सुटण्यासारखे नव्हते. आपल्या विवाहबाह्य संबंधावर आक्षेप घेणारा व शेतीत हिस्सा मागणाऱ्या निलेशबद्दल कायमचा तोडगा काढण्याचा विचार प्रभाकर माळवाड यांच्या मनात सुरु झाला होता. जन्मदाता बापच मुलाच्या जिवावर उठण्याची तयारी करण्यास सरसावला होता. ३ जानेवारी सुटीचा दिवस उजाडला. रवीवार असल्यामुळे तिघे जण घरातच होते. नेहमीप्रमाणे निलेशने विषयाला सुरुवात केली. आपल्या शेतात मला पोल्ट्री फार्म टाकून द्या अशी फर्माईश निलेशने त्याचे वडील प्रभाकर माळवाड यांचेकडे केली. मुलाची मागणी ऐकताच बाप प्रभाकर माळवाड यांच्या संतापात भर पडली. तु काहीच कामाचा नाहीस, मी तुला काहीच करु देणार नाही असे म्हणत त्यांनी वादात भर टाकली. सुटीचा दिवस देखील असाच वादात गेला. दिवसभर दोघा बाप बेट्यातील वाद शमण्याची चिन्हे दिसत नव्हती. शेवटी प्रभाकर माळवाड यांच्या पत्नीने बाप बेट्यातील वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर कसेबसे दोघे जण शांत झाले. मात्र तुझा एके दिवशी गेमच करतो ही धमकी देण्यास बापाच्या रुपातील प्रभाकर माळवाड विसरले नाही. सकाळी भल्या पहाटे उठून प्रभाकर माळवाड यांनी

01 TO 07 FEB 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 30/01/2021 9:38 PM Page 1

थोडक्यात वृत्तांत

पालकमंत्री दादाजी भूसे यांनी नविन शासकीय इमारतीची केली पाहणी

पालघर : कृषी माजी सैनिक कल्याण मंत्री तसेच पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी निर्माणाधिन शासकीय इमारतीची पाहणी केली. यावेळी खासदार राजेंद्र गावीत, आमदार श्रीनिवास वनगा, जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ, जिल्हापरिषद मुख्यकार्यकारी अधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलिस अधिक्षक दत्तात्रय शिंदे, तसेच विविध विभागाचे अधिकारी व सिडकोचे कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, पोलीस अधिक्षक कार्यालय, सेशन कोर्ट, प्रशासकिय इमारत अ आणि ब, अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी निवास व्यवस्था, गेस्ट हाऊस, ऑडिटोरियम, चार व्ही.आय.पी बंगले एवढ्या शासकिय इमारती १०३ हेक्टर क्षेत्रफळामध्ये उभारल्या जात आहेत. या निर्माणाधिन कामाची पाहणी पालकमंत्री दादाजी भूसे यांनी केली.

आष्टामोड ते उदगीर रस्त्याच्या कामाची गती वाढवावी –राज्यमंत्री संजय बनसोडे

लातूर : आष्टामोड ते उदगीर रस्त्याचे काम चालू असून या कामाची कंत्राटदाराने गती वाढवून काम दर्जेदार करण्याचे राज्याचे निर्देश पर्यावरण, पाणीपुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), रोजगार हमी, भूकंप पुनर्वसन व संसदीय कार्य राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी दिले. आष्टामोड ते उदगीर या कामास राज्यमंत्री श्री.संजय बनसोडे यांनी आज अचानक भेट देऊन पाहणी केली. यावेळी औरंगाबाद विकास महामंडळाचे अधिक्षक अभियंता बापूसाहेब साळुंके, उपअभियंता अशोक इंगळे, टिम लिडर दिपक गोयल, एस.आर.शिंदे,कंत्राटदार गजानन पोकलवार यांच्यासह बस्वराज पाटील नागराळकर, शिवाजीराव मुळे उपस्थित होते. यावेळी राज्यमंत्री बनसोडे म्हणाले की, पावसाळयापूर्वी आष्टामोड ते उदगीर रस्त्याच्या एक बाजूचे काम पूर्ण करुन या रस्त्यावरील १३ पूलाचे बांधकाम जून पर्यंत पूर्ण करण्याच्या संबंधितांना सूचना दिल्या. या रस्त्याच्या कामा बाबत काही अडचणी असतील तर तहसिलदार,संबंधित अधिकारी यांच्याशी समन्वय साधून अडचणी सोडवून कामे पूर्ण करावेत. या कामाचा दर पंधरा दिवसांनी आढावा घ्यावा असे ही यावेळी त्यांनी सूचित केले.

लोकल प्रवास करण्यास परवानगीबद्दल नागरिकांच्यावतीने शासनाचे अभिनंदन!

मुंबई : शासनाने सर्व नागरिकांना दिवसभराच्या ठराविक वेळेत लोकलमधून प्रवास करण्यास परवानगी दिल्याबद्दल मुख्यमंत्री श्री.उद्धव ठाकरे यांचे सर्व नागरिकांच्या वतीने उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आभार मानले आहेत. कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर शासनाने मुंबईतील सर्व लोकल बंद केल्या होत्या. त्यामुळे कोविड १९ चा प्रसार आटोक्यात येणेंस खूप मदत झाली. मिशन बिगीन अगेन सुरू झाल्यावर शासनाने अनेक गोष्टी पुन्हा सुरू करण्यास परवानगी दिली. नागरिकांना वैद्यकीय सेवा व उपचारासाठी विविध दवाखान्यात जावे लागते. अनेकांना गंभीर आजार असतानाही दवाखान्यात जाणे शक्य नव्हते. कामकाजही करणे शक्य नव्हते. पण आता सर्वांना ठराविक वेळेत लोकल प्रवास करण्यास परवानगी दिल्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रवेशिकांसाठी १५ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

मुंबई : माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी प्रवेशिका पाठविण्याची मुदत दि.३१ जानेवारी २०२१ होती. तथापि या प्रवेशिका सादर करण्याकरिता दि.१५ फेब्रुवारी २०२१ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने dgipr. maharashtra. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

दुभत्या जनावरांना खादय वैरणीचे बियाणे मोफत वाटप होणार

लातूर : सन -२०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी दुभत्या जनावरांना खादय उपलब्धतेसाठी सुधारणा कार्यक्रमांतर्गत (सर्वसाधारण योजना) वैरणीचे १०० टक्के अनुदानावर बियाणे पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद, लातूर कडून वाटप करण्यात येणार आहे. जिल्हयातील सर्व तालुक्यातून या योजनेसाठी अर्जदाराकडून अर्ज मागवण्यात येत आहेत. अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्रे संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (वि) पं.स/ किंवा नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याकडून उपलब्ध करुन घ्यावेत.पुर्णपणे भरलेले विहित नमुण्यातील अर्ज दि. १ फेब्रुवारी २०२१ ते मार्च २०२१ या कालावधीत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्यात जमा करावेत. लाभार्थ्यांची निवड पात्र अर्जामधुन सोडत पध्दतीने करण्यात येणार आहे. त्यामुळे ३ मार्च २०२१ नंतर प्राप्त होणाऱ्या किंवा अपुर्ण अर्जाचा निवडीच्या सोडतीस विचार केला जाणार नाही. जास्तीत जास्त संख्येने लातूर जिल्हयातील सर्व जातीच्या व्यक्तींनी अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परीषद डॉ.आर.डी.पडीले यांनी केले आहे.

बांधकाम खात्याचे अधिकारी पदाधिकारी दरबारात आणि सर्वसामान्य जनता मात्र रस्त्याच्या खड्ड्यांत!

जळगाव/हमीद तडवी

रावेर तालुक्यातील कुसूंबा ते रावेर हा रस्ता गेल्या दोन वर्षापासुन खड्डड्यात गेला असल्याने या रस्त्याला उतरती कळा लागल्याने ह्या रस्त्याने प्रवास करीत असतांना वाहन धारकांना, प्रवाशांना, शेतकऱ्यांना मजुरांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. कारण या कुसूंबा ते रावेर या रस्त्यात जागोजागी मोठमोठे खड्डे पडल्याने रहदारीला खुप मोठा अडथळा निर्माण झाला आहे. त्याचबरोबर या रस्त्याच्या खड्ड्यांमुळे दिवसेंदिवस या रस्त्याच्या खड्ड्यांमुळे अपघातांमधे मोठ्या प्रमाणात वाढ होतांना दिसत आहे.

हा सगळा प्रकार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना, आमदार, खासदार व संबधित मंत्री यांना माहिती असल्यावरही जाणीवपुर्वक या कुसुंबा ते रावेर रस्त्यांसह संपुर्ण तालुक्यासह जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील रस्त्यांकडे दुर्लक्ष करीत असल्याचे चित्र दोन वर्षापासून पहावयास मिळत आहेत. तसेच संबधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधी देखील हा संबधित रस्त्यांकडे दुर्लक्ष करुन बघ्याची भुमिका घेत आहे आणि रावेर तालुक्यासह जिल्ह्यातील जनतेचे हाल व भावना दुखावण्याचे काम संबधित विभाग करीत असल्याचे जनतेकडुन ऐकवण्यास मिळत आहे. तसेच पाल ते इंदोर हा रस्ता हायवे बनल्याने संपुर्ण भारतातुन मोठमोठे ट्रक क्षमतेपेक्षा जास्त भरतीचे ट्रक हे राजस्थान, दिल्ली, झारखंड, हरियाना, पंजाब, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेशकडुन या रस्त्याने येजा करीत असतात यामुळे देखील लहान वाहनधारकांचा, प्रवाशांचा जीव टांगणीला लागला आहे. याकडे परिवहन अधिकाऱ्यांचे देखील दुर्लक्ष होत असल्याचे तालुक्यातील जनतेकडुन बोलले जात आहे. तरी संबधित बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी ताबडतोब जागे व्हावे व या कुसुंबा ते रावेर, लोहारा ते कुसूंबा मार्गावरील १ ते २ किलोमीटरचा रस्ता सुकी नदी पुला पर्यंतचा रस्ता ताबडतोब डांबरीकरण करावा. अशी तालुक्यातील परिसरातील शेतकरी, मजुर, वाहन धारकांकडुन रास्त स्वरुपाची मागणी करण्यात आली आहे. पाहुया या संबधित रस्त्यांची दखल घेतली जाते किंवा नाही, याकडे मात्र तालुक्यांसह जिल्हयाच्या जनतेचे लक्ष लागुन आहे.

लोकलची वेळ पाळली नाही तर प्रवाशाला होणार कठोर शिक्षा!

मुंबई/प्रतिनिधी

अखेर अनेक महिन्यांनंतर सर्व सामान्य जनतेसाठी लोकल सेवा चालू होणार आहे. मुंबईकरांची लाईफलाईन पुन्हा सर्वांसाठी रूळावर येत असल्यामुळे सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत असून दिलासा देणारी बाब देखील आहे. कोरोना महामारीनंतर अखेर लोकल सुरू होणार आहे. सर्व प्रथम लोकल आत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी सुरू करण्यात आली. त्यांनतर महिलांना ट्रेनने प्रवास करण्याची परवानगी मिळाली. आता १ फेब्रुवारीपासून सर्वांसाठी लोकल सुरू होणार आहे. मात्र रेल्वेने लोकलने प्रवास करण्यासाठी काही वेळा ठरवून दिल्या आहे. राज्य सरकार आणि रेल्वेने मंजूर केलेली वेळ वगळून अन्य वेळेत प्रवास केला तर त्या प्रवाश्यांना कठोर शिक्षा होणार आहे. आपत्ती व्यवस्थापन कायदा, आयपीसी १८८ आणि रेल्वे कायदा यानुसार त्या प्रवाश्यांवर कारवाई होईल. असं स्पष्टीकरण मुंबई लोहमार्ग पोलिस आयुक्त रवींद्र सेनगावकर यांनी केलं. त्यामुळे सामान्य जनतेला लोकलने प्रवास करताना वेळ पाळणं बंधणकारक आहे. राज्य सरकार व रेल्वेने लोकल सुरू करण्याचा निर्णय घेतला पण आता सरकारवर अधिक ताण पडणार आहे. गर्दी टाळण्यासाठी रेल्वे पोलिसांना एकूण २६५० सुरक्षा रक्षकांची अतिरिक्त रसद पुरवण्यात आली आहे. रेल्वे स्थानकांवर सुरक्षा सुरक्षा पुरवण्यासाठी २००० होमगार्ड आणि ६५० सुरक्षा पुरवण्यासाठी रेल्वे पोलिसांना एकूण २६५० सुरक्षा रक्षकांची अतिरिक्त टीम तैनात करण्यात आली आहे. त्महिलांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक डब्यात रेल्वे पोलीस नियुक्त करण्यात येणार आहे. शिवाय कोणतीही अडचण अल्यास प्रवासी १५१२ या रेल्वे पोलिसांच्या हेल्पलाइनवर संपर्क प्रवासी साधू शकतात.

सोलापूर येथील गो मांस विक्री व मटका बंद करण्याची मागणी

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

सोलापूर शहरात सदर बझार व जेल रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदेशीर मांस विक्री व मटका बुकी चालविणाऱ्या वर त्वरित कारवाई करण्यात यावी असे निवेदन सोलापूर जिल्हा श्रीराम सेनाचे जिल्हा संयोजक सिद्धाराम नंदरगी यांनी या दोन्ही पोलीस ठाण्याकडे दिली आहे. सोलापूर शहरात काही महिन्यांपूर्वी सोलापूर शहर पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी अवैध धंदे वाल्याचे कंबरडे मोडले होते सर्वच अवैध धंदे पूर्णपणे बंद झाले होते. आता या दोन्ही पोलीस ठाण्याच्या हद्दीत काही ठिकाणी पुन्हा चोरी चोरी चूपके चूपके धंदा मोठ्या जोमाने सुरू आहेत. यांना कोणाचे आशीर्वाद म्हणावे लागेल असे जनतेतून चर्चिले जात आहेत. शहरात अनेक ठिकाणी रस्त्यावर मांस कापून खुलेआम मांस टांगून विकला जातो. तसेच जनावरांची हत्या पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचा प्रथम निदर्शनास येतो. शाकाहारी कुटुंबाला व बालकांना अनेक ठिकाणी टांगून मांस विक्री करणारा खुलेआम दिसतो त्याचा बालमनावर व शाकाहारी कुटूंबावर खूप मोठा आघात होतो व लहान मुलांच्या अनेक प्रश्नांना त्यांच्या पालकांना सामोरे जावे लागत आहे. व जाणून बुजून लहान मुलांना खोटे बोलून किंवा त्यांना रागावून शांत बसवावे लागते. रस्त्यावर टांगून मांस उघडउघड विक्री करणे कायदेशीर बंदी असताना सुद्धा सर्रास विकला जात आहे. पोलीस प्रशासन व महापालिका आरोग्य विभागाचा त्यांना भीती राहिलेली नाही. शहरात मांस विकणारे हे सर्रास मुस्लिम समाजातील विक्रेते असल्याने श्रीराम सेनेचे कार्यकर्त्याकडून जाब विचारता क्षणी दोन समाजामध्ये तेढ निर्माण झाल्याचे कांगावा केला जातो. कायदेशीर बाबी पूर्णपणे तपासणी करून सदर प्रकरणावर योग्य ती कारवाई त्वरित करण्यात यावी तसेच सदर बझार व जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत मटका बुकी वाल्यांचा गुंडगिरी, झुंडशाही फार मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येत आहे. त्यावर सुद्धा आपण त्वरित ठोस उपाययोजना करून कारवाई करण्यात यावी, असे श्रीराम सेनेचे जिल्हा संयोजक सिद्धाराम नंदरगी यांनी दोन्ही पोलीस ठाण्याकडे निवेदन दिले आहे.

लातूरमध्ये असंख्य शिवसैनिकांचा भाजपात प्रवेश



लातूर/प्रतिनिधी

लातूर शहरातील प्रभाग क्र. १७ मधून गतवेळेस शिवसेनेकडून मनपाची निवडणूक लढविलेले विवेक साळूंके यांनी आपल्या असंख्या समर्थकांसह आ. निलंगेकरांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपात प्रवेश केला.

यावेळी शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, संघटन सरचिटणीस मनिष बंडेवार, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ॲड. ज्ञानेश्वर चेवले, शहर भाजपाचे चिटणीस ॲड. दिग्विजय काथवटे, मडल अध्यक्ष तथा नगरसेविका शोभा पाटील यांची यावेळी उपस्थिती होती. पक्ष संघटनेच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाच्या योजना पोहंचल्या पाहिजे आणि त्यांचे हित साधले जावे हेच भाजपाचे धोरण असल्याचे सांगून राज्यात सत्तेत असताना अनेक विकासाची कामे केलेली असून लोकहिताला प्राधान्य देण्यात आलेले होते. केंद्र सरकारच्या माध्यमातूनही सबका साथ सबका विकास हे धोरण राबविले जात आहे.

या धोरणावर विश्र्वास ठेवत भाजपात प्रवेश करणार्यांची संख्या वाढत असून पक्षात प्रवेश केलेल्यांना परिवाराचे सदस्य म्हणूनच मान दिला जाईल अशी ग्वाही माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी दिली. यावेळी विवेक साळूंके सह हरिभाऊ देशमुख, अर्जून शेंडगे, कमलाकर शिंदे, सादिक पठाण, गणेश उगिले, रणजीत मोहिते, अजय चिंचोले, विष्णू ढोक, भरत डोंबाळे, विश्र्वजीत शिंदे, सुशात पाटील, चंद्रकांत पाटील, विष्णू शिंदे, दर्शन रेड्डी, वजीर मुजेवार, अभिजीत राठोड, श्रीकांत पाठक, सतिष वाडकर, सोपान गुरमे, मयुर कांबळे, लखन शेंडगे आदिंसह असंख्य शिवसैनिकांनी भाजपात प्रवेश केला.

वाडा तालुक्यातील गाला कंपनीत कायमस्वरूपी कामगारांची ११६०० रुपयांची भरघोस पगारवाढ!

वाडा/प्रतिनिधी

वाडा तालुक्यातील मुसारणे ग्रामपंचायत हद्दीतील गाला प्रिसीजन इंजीनअरिंग प्रा.ली या कंपनीतील कायमस्वरूपी कामागारांची श्रमिक सेना युनियनचे संस्थापक अध्यक्ष गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली दि.२९ जानेवारी २०२१ रोजी ११६०० रूपयांची भरघोस पगार वाढ झाली आहे. सदर वाडा तालुक्यातील गाला प्रिसीजन इंजिनिअरिंग प्रा.ली ही कंपनी डिस्क स्प्रिंग बनविणारी कंपनी असून श्रमिक सेना युनियन ही कामगाराची संघटना आहे.गेल्या १५ महिन्यापासून कामगार प्रतिनिधी व कंपनी व्यवस्थापन यांच्यामध्ये शातंतेच्या मार्गातून चर्चा चालू होती.अखेर युनियन अध्यक्ष माजी खा.डॉ संजीव नाईक यांच्या यशस्वी मध्यस्थीने कंपनी व्यवस्थापणाने अखेर तीन वर्षासाठी ११६०० रूपयांची पगारवाढ थकबाकीसह देण्याचे मान्य केल आहे. संपूर्ण देशात कोरोना महामारीमुळे अनेक उद्योगधंदे बुडाले असताना तसेच अनेक कामगारांचे रोजगार गेला असताना.या कंपनीतील कामगारांची तीन वर्षासाठी मोठ्या रकमेची पगारवाढ वाडा सारख्या ग्रामीण भागात झाल्याने कामगार वर्गात आनंदाचे वातावरण आहे. सदर हा करार यशस्वी करण्यासाठी कंपनी व्यवस्थापणाच्या वतीने तुकाराम बेहेरे व अवधुत पणशिकर तर श्रमिक सेना युनियनचे सरचिटणीस चरण जाधव व कामगार प्रतिनिधी जयेश घोडविदे, सचिन भोईर, मोहन पाटील, नामदेव काते, सूरेश दिनकर यांनी विषेश मेहनत घेतली आहे.

आठ लाखांचा मळीचा ट्रक पकडला

सोलापूर/प्रतिनिधी

राज्य उत्पादन शुल्क मुंबईच्या भरारी पथकाने शनिवारी तुळजापूर रस्त्यावर उळे गावाजवळ सुमारे आठ लाखांचा अवैध मळी वाहतूक करणाऱ्या आयशर ट्रक पकडला आहे. पथकाने आयशर ट्रक (एमएच १३ एएक्स ४४३७) या मळीने भरलेल्या आयशर वाहनांमध्ये ३७ लोखंडी बॅरलसह १० मेट्रिक टन मळी जप्त करण्यात आली आहे. सदर जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत ७ लाख ८४ हजार इतकी असून, त्या आयशर ट्रक वाहनचालकास अटक करण्यात आली आहे. ही सदर कारवाई आयुक्त उमाप यांच्या आदेशानुसार संचालक उषा वर्मा, विभागीय उपायुक्त सुनील चव्हाण, प्रसाद सुर्वे, सोलापूर अधीक्षक रवींद्र आवळे, उपअधीक्षक पवार, निरीक्षक लाड यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई भरारी पथकाचे दुय्यय निरीक्षक प्रशांत निकाळजे, एम.एम.चव्हाण आदींनी कारवाई केली आहे.

अहमदपूर मधील भाग्यनगर बनले बेकायदा गुटखा विक्रीचा अड्डा

अहमदपूर/प्रतिनिधी

अहमदपूर शहरात बेकायदा गुटखा विक्रीला तेज आले असून अहमदपूर येथील भाग्यनगर परिसरा बेकायदा गुटाखा विक्रीचा आड्डा बनला आहे. परप्रांतातून येत आसलेला प्रतीबंधीत गुटख्याचा साठेबाजार करून चढ्याभावाने विक्री केली जात आसल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. या परीसरातून गुटखा वाहतुक करणाऱ्या बोलरो जिपवर अहमदपूर पोलिसांनी कारवाही करीत एका वहानासह सुमारे पाच लाख २४ हजार रुपयांचा गुटखा पकडला आहे.

७याबात पोलिस सुत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, अहमदपूर पोलिसांना एका गुप्त माहीती वरून भाग्यनगर परीसरातून एका बलोरा कंपनीच्या जिप मधुन गुटखा तस्करी होणार आसल्याची माहीती मिळाली होती. मिळलेल्या माहीती अधारे उपविभागीय पोलिस अधिकारी बलराज लांजिले, अहमदपूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बिर्ला यांच्या मार्गदर्शनाखाली अहमदपूर पोलिसांनी भग्यनगर परीसरात सापळा लावून एम एच २४ जे ९०५६ महिंद्रा बोलेरो पिकअपची झाड-झडती घेतली असता जिपमध्ये प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा एक्का गुटखा १३२५ पॉकेट किंमत १,८५,५०० रुपये, गुलाम गुटका ८७५ पॅकेट किंमत ८७५०० रुपये, सुगंधित तंबाखू ५० पॅकेट किंमत १५०० असा एकूण प्रतिबंधित साठा २७४५०० रुपये आढळून आला. एम एच २४ जे ९०५६ महिंद्रा बोलेरो पिकअप किंमत अंदाजे २,५०,००० रुपये असा एकुन ५,२४,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी दयानंद विठ्ठलराव पाटील यांच्या फिर्यादीवरून विनायक माधवराव गोंड राहणार जांब (बु.) ता. मुखेड जिल्हा नांदेड यांच्या विरुद्ध गु.र. नं. ३२/ २०२१ कलम ३२८,१८८,२७२,२७३ भा.द.वी. सह कलम ५९ अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलिस निरीक्षक सुनील बिर्ला यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक एकनाथ डक करीत आहेत. शहरातील अनेक पानपट्टीवर सहज गुटखा मिळत असल्याचे चित्र आहे. अहमदपुर शहरात पोलीस स्टेशन पासून २५० ते तीनशे मीटर अंतरावर असलेले भाग्यनगर हे गुटखा विक्रीची प्रमुख केंद्र असून मागील दोन वर्षापासून येथे खुलेआम गुटखा विक्री होत आहे. २६ डिसेंबर २०२० रोजी अहमदपुर तालुक्यातील वंजारवाडी पाटीजवळील आखाड्यावर ३१ लाख ५० हजार रुपयांचा गुटखा जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला होता. असे असताना भाग्यनगर येथून पहाटे व रात्रीच्या वेळेस राजरोषपणे गुटखा विक्री केली जात आहे. या गुटखाविक्रेत्याला राजकीय पाठबळ असल्यामुळे पोलीस यंत्रणा याकडे कानाडोळा करत आहे असे नागरिकातून बोलले जात आहे. यावर अहमदपुर पोलीस प्रशासन पुन्हा कारवाई करणार का? किंवा गुटखा विक्रेत्याला राजकीय पाठबळामुळे पुन्हा अभय देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

01 TO 07 FEB 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 30/01/2021 9:38 PM Page 1

सरकारी लाठी...!

'जिसकी लाठी उसकी भैसं' अशी एक म्हण आहे आणि ती खरीच आहे. कारण स्वातंत्र्य प्राप्ती नंतर या देशात ज्या ज्या पक्षांची सरकारे आली त्यांनी लोकशाहीला लाठीच्या धाकावर अक्षरशः नाचवले. विरोधकांना नामोहरम करण्यासाठी सरकारी यंत्रणांचा तसेच प्रसार माध्यमांनाही दुरुपयोग केला. त्यामुळे आता लोकांचाही या देशातील लोकशाहीवर आणि इथल्या राजकीय पक्षांवर विश्वास राहिलेला नाही. भारत देश हा कृषीप्रधान देश आहे, तरीही या देशातील बळीराजाला त्याच्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी दोन दोन महिने थंडी वाऱ्यात पोराबलाना घेऊन रस्त्यावर बसून आंदोलन करावं लगत. अशावेळी या शेतकऱ्यांची बाजू समजून घेऊन त्याला न्याय देण्याऐवजी त्याच आंदोलन तोडण्यासाठी शेतकरी संघटनांमध्ये फूट पाडली जाते. शेतकरी आंदोलन मागे घेत नसल्याने हिंसाचार घडवून त्याचे बिल शेतकरी नेत्यांवर फाडले जाते आणि मीडियातून तासा दुषप्रचार केला जातो. ही बाब अत्यंत गंभीर तसेच शेतकरी आणि सरकार यांच्यात आणखी दुरावा निर्माण करणारी आहे. कृषी कायदा मागे घ्यावा यासाठी अडून बसलेल्या शेतकरी संघटनांशी सरकारच्या ११ बैठका झाल्या, पण तोडगा निघाला नाही. अशावेळी आंदोलक टोकाची भूमिका घेऊ शकतात याची सरकारला जाणीव असायला हवी होती. आणि त्या दृष्टीने सरकारने उपाययोजना करायला हव्या होत्या. पण सरकारच्या मनात नेमके काय होते कुणास ठावूक? कारण पुढे २६ जानेवारीला जे काही घडले ते भयानक आणि धक्कादायक होते. प्रजस्तक दिनी शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टर रॅलीला परवानगी देण्याची चूक कोणी आणि का केली याची सविस्तर चौकशी व्हायला हवी. कारण या रॅलीत हिंसाचार होऊन एका शेतकऱ्याला त्याचा जीव गमवावा लागला. तर ८३ पोलिस कर्मचारी जखमी झाले. काही आंदोलक सुद्धा जखमी झालेत. पण त्यांचा आकडा उपलब्ध नाही. या घटनेमुळे जे लोक या आंदोलनाला बदनाम करण्यासाठी टपून बसलेले होते त्यांना संधी मिळाली आणि गेल्या दोन महिन्यांपासून अत्यंत शांततेने सुरू असलेल्या या आंदोलनाला गालबोट लागले. सध्या इलेक्ट्रॉनिक मीडिया कडून आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांची बदनामी सुरू आहे. कारण शेतकऱ्यांना पूर्णपणे बदनाम करण्यासाठी आणि आंदोलन तोडण्यासाठी सुपारी घेतलेल्या इलेक्ट्रॉनिक मीडियाला नेमके हेच हवे होते. त्यामुळे आता आंदोलनात शेतकरी नसून खलिस्तान वादी आहेत. माओवादी आहेत. देशविघातक शक्ती आहेत, असा सुरवातीपासूनच ज्या लोकांनी दुशप्रचार सुरू केला होता. त्याला २६ जानेवारीच्या घटनेने पुष्टी मिळाली. शेतकऱ्यांना बदनाम करण्यात सूपरीबाज इलेक्ट्रॉनिक मीडियाला यश आले. पण अशा प्रकारे जर लोकशाही मार्गाने सुरू असलेली आंदोलने चिरडली जावू लागली तर लोकांनी न्यायासाठी कोणाकडे दाद मागायची? या देशात आपल्याला न्याय मागण्यांसाठी शांततेने आंदोलने करण्याचा अधिकार घटनेनेच दिला आहे आणि सरकार लोकांच्या या अधिकारावर गदा आणणारे असेल तर लोकांचा संयम सुटू शकतो. अगोदरच पंजाब अशांत आहे. तिथला निम्मा तरुण नशेच्या आहारी गेला आहे त्याला खलिस्तानची मागणी करणाऱ्यांनी आपल्याकडे वळवून खलिस्तानी दहशतवादी बनवले आहे, तर जो तरुण प्रामाणिकपणे शेतात राबून देशवासीयांना दोन घास भरवत आहे. त्याला त्याच्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागतेय. अशावेळी त्याचे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न झाला, तर आंदोलनकर्ते खरोखरच खलिस्तानी दहशतवादी बनतील आणि त्यातून हजारो भिंद्रनवाले तयार होऊन पंजाब पुन्हा हिंसेचे अग्निकुंड भडकेल. आणि तसे झाले तर त्याला जबाबदार सरकार आणि शेतकरी आंदोलनाला बदनाम करणारे इलेक्ट्रॉनिक मीडिया असतील. शेतकऱ्यांच्या काय समस्या आहेत. हे सरकारला जास्त ठाऊक आहे की शेतकऱ्यांना निदान याचा तरी विचार करावा. राहता राहिला प्रश्न मीडियाचा तर त्यांनी या प्रकरणात समन्वयाची भूमिका घ्यायला हवी होती. कारण लोकशाहीच्या चौथ्यास्तंभाचे तेच काम आहे. निःपक्ष पत्रकारितेच्या माध्यमातून सरकार आणि आंदोलनकर्ते दोघांचीही बाजू लोकांसमोर ठेऊन यावर लोकांना विचार करून त्यांची भूमिका मांडायला सांगणे हे मीडियाचे काम होते, पण मीडियाने या प्रकरणात एकतर्फी वृत्तांकन करून पत्रकारितेच्या मूळ उद्देशालाच डांबर फासले. त्यामुळे आता इलेक्ट्रॉनिक मीडियावर लोकांचा काडीचाही विश्वास राहिलेला नाही. या देशात एकूण लोकसंख्येच्या ५० टक्क्यांहून अधिक शेतकरी आहेत. त्यामुळे येवढ्या मोठ्या वर्गाची विश्वासाहर्ता मीडियाने गमावलेली आहे. आज या देशात बहुसंख्य शेतकरी सरकार आणि एकतर्फी वृत्तांकन करणाऱ्या मिडीयाला दोष देत आहेत. आंदोलनात हिंसाचार घडवायला लाऊन काही काळासाठी आंदोलनाची तीव्रता कमी करता येते, पण आंदोलन संपवता येत नाही. उलट अशा गोष्टींमुळे आंदोलनकर्ते सुडाने पेटून उठतात आणि पलटवार करण्यासाठी कोणताही थराला जाऊ शकतात. शेतकरी आंदोलनात घडलेल्या हिंसाचाराने याच धोक्याची जाणीव करून दिली आहे. आज ज्या बळीराजाच्या हाती नांगर आहे, जोडीला खिल्लारी बैलजोडी आहे. त्याच बळीराजाच्या हाती उद्या एके ४७ असेल आणि जोडीला हिंसक विचारधारा असेल अशावेळी काय घडेल हे सांगता येणार नाही म्हणून सरकारने विषाची परीक्षा पाहू नये आणि मिडीयाला सुद्धा मर्यादेत राहण्याचे आदेश द्यावेत. कारण दुखावलेला माणूस कधी आणि कसा पलटवार करेल याचा नेम नाही. त्यामुळे २६ जानेवारीच्या घटनेनंतर देशात जी काही परिस्थिती निर्माण झाली आहे ती सरकारने अत्यंत शांतपणे हाताळणे गरजेचे आहे. त्यात कुठलेही राजकारण आणि नये. कारण शेवटी हा देशाच्या अंतर्गत सुरक्षेचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा प्रश्न आहे. अगोदरच या पूर्वीच्या दोन भयंकर घटनांमुळे शीख समाज दुखावला आहे. त्यातील पहिली घटना म्हणजे सुवर्ण मंदिरावर केलेली ऑपरेशन ब्ल्यू स्टार कारवाई. त्या कारवाई नंतर शीख समाज प्रचंड संतापला होता, यांचा तो संताप कायम असतानाच तत्कालीन पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांच्या हत्ते नंतर दिल्लीत ज्या पद्धतीने शीख समाजातील निष्पाप लोकांच्या हाय झाल्या त्याच्या अजूनही जखमा ताज्या आहेत. असे असताना पंजाब हरयाणातील शेतकऱ्यांचे आंदोलन चिरडून टाकले तर शीख समाजाच्या असंतोषाचा तिसरा स्फोट होईल. तेंव्हा अजूनही वेळ गेलेली नाही. सरकारने आंदोलनकर्त्या पंजाब-हरयाणातील शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण कराव्यात आणि हे प्रकरण सामोपचाराने मिट वावे त्यातच देशाचे आणि सरकारचे सुधा होत आहे. वास्तविक सरकारने कृषी विधेयके तयार करण्यापूर्वी शेतकरी संघटनांशी सविस्तर चर्चा करायला हवी होती. केवळ सवंग लोकप्रियतेसाठी शेतकऱ्यांना त्यांचा माल कुठेही विकण्याचे स्वातंत्र्य दिले म्हणजे शेतकऱ्यांसाठी खूप काही केले असे नाही. कारण उत्पादन आणि वितरण यामध्ये एक मोठी यंत्रणा असते आणि याच यंत्रणेच्या माध्यमातून उत्पादित मालाची विक्री होत असते. हा माल कुठे, कसा आणि कोणत्या किमतीत विकायचा हे ती मधली यंत्रणा ठरवत असते. आणि त्यासाठी लागणारी सर्व साधने त्या यंत्रणेकडे असतात. शेतकऱ्यांच्या शेतातला माल शेतकरी बाजार समित्यांमध्ये असतो आणि बाजार समित्यांच्या माध्यमातूनच हा सर्व माल घाऊक आणि पुढे किरकोळ बाजारात विक्रीसाठी पाठवला जातो, पण जर का बाजार समित्या नसतील तर शेतात पिकावलेला माल शेतकरी पाटीत घेऊन घरोघरी जाऊन विकणार आहे का? आणि हे सगळ जे शेतकरी आहेत किंवा ज्यांचा कृषी व्यवसायाशी संबंध आलाय, त्यांनाच कळणार ज्यांनी कधी शेत पाहिलं नाही. शेतात पाय ठेवला नाय ज्यांना कांदे बटाटे जमिनीच्या खाली लागतात की जमिनीच्या वर झाडाला लागतात हे ठाऊक नाय. त्यांनी कृषी मालाचे उत्पन्न आणि विक्री बाबत धोरण ठरवावे हा एक मोठा विनोद आहे. पण सरकारचा हा विनोद जर ६५ कोटी शेतकऱ्यांच्या गळ्याचा फास बनणार असेल, तर देशवासीयांनी त्याला विरोध करायलाच हवा.

ओसाड गावची पाटीलकी

संध्या स्ट्रोक
सोनू जाधव

तब्बल सव्वाशे वर्षांची ऐतिहासीक पार्श्वभूमी असलेल्या काँग्रेस पक्षाची आज प्रादेशिक पक्षा पेक्षाही वाईट अवस्था झाली आहे. गांधी, नेहरू, पटेल यांच्या सारख्या स्वातंत्र्य संग्रामातील रथी महारथींनी ज्या पक्षाचे अध्यक्ष पद भूषविले त्या पक्षाला आज अध्यक्ष मिळू नये यासारखे दुर्दैव नाही. आणि याचे एकमेव कारण म्हणजे आज संपूर्ण देशात काँग्रेसची ढासळलेली प्रतिमा! ओसरत असलेला जनाधार!! परिणामी आज काँग्रेसचे अध्यक्षपद असो की प्रदेशाध्यक्षपद कुणीही ते स्वीकारायला तयार नाही. कारण आज काँग्रेस केवळ नावा पूर्ती उरली आहे. त्यामुळे काँग्रेसचे अध्यक्षपद किंवा प्रदेशाध्यक्षपद म्हणजे ओसाड गावची पाटीलकी असे राजकीय नेत्याना वाटतेय. कारण अध्यक्षपद किंवा एखाद्या राज्याचे प्रदेशाध्यक्षपद स्वीकारायचे तर तिथे पक्षाची संघटनात्मक ताकत मजबूत करण्याचे अवघड आव्हान असते आणि पक्षाची ताकत वाढवण्यासाठी कार्यकर्ते लागतात. पण आज परिस्थिती अशी आहे की काँग्रेस पक्षाकडे कार्यकर्तेच राहिलेले नाहीत. त्यामुळे अध्यक्षपद किंवा प्रदेशाध्यक्षपद स्वीकारून काँग्रेस पक्ष कुणाच्या जीवावर वाढवायचा? आणि हीच वस्तुस्थिती काँग्रेस मधल्या राहुल गांधी यांच्यासह अनेक बड्या नेत्याना ठाऊक असल्याने नेतृत्वाची धुरा खांद्यावर घ्यायला ते तयार नाही. त्यातच मोदी आणि भाजपने लोकांना धर्माच्या बंधनात गुरफटून टाकायला सुरुवात केल्याने लोकही देवभोले बनून मोदी जे सांगत आहेत ते निमूटपणे ऐकून त्यांनी दाखवलेल्या दिशेने भरकटत चालले आहेत आणि त्यांना रोखण्याची ताकत आज काँग्रेसच काय कुठल्याही पक्षात नाही. त्यामुळे या देशाचे काय होणार कुणास ठाऊक? काँग्रेसला गेल्या वर्षभरापासून राष्ट्रीय अध्यक्ष मिळत नसला तरी मुंबई काँग्रेसला मात्र भाई जगताप यांच्या रूपाने एक उमदा अध्यक्ष मिळाला आहे. मात्र मुंबई काँग्रेस म्हणजे एक गाव बारा भानगडी अशातला प्रकार असल्याने इथे भाईंची फार काळ डाळ शिजणार नाही. तर दुसरीकडे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदाची माळ पृथ्वी बाबांच्या गळ्यात घालण्याचा घाट घातला जात आहे. अगोदर विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांच्या नावाची चर्चा होती. त्यांना प्रदेशाध्यक्ष करून बाबांना विधानसभा अध्यक्ष पदाच्या खुर्चीत बसवून राष्ट्रवादीवर अंकुश ठेवण्याची योजना होती. पण पवारांना याचा सुगावा लागताच ते खवळले. कारण पृथ्वी बाबा आणि राष्ट्रवादीचा ३६ चा आकडा आहे. राष्ट्रवादीच्या नेत्यांचे घोटाळे बाबांनीच उघडकीस आणले. मग तो सिंचन घोटाळा असो की शिखर बँक घोटाळा असो! सत्तेत एकत्र असतानाही बाबांनी राष्ट्रवादीच्या नेत्यांचां पॉलिटिकल गेम केला.

त्यामुळे अशा माणसाला विधानसभा अध्यक्ष पदाच्या खुर्चीत बसवले तर तो महा विकास आघाडीसाठी कुऱ्हाडीचा दांडा होतास काळ ठरेल. म्हणूनच त्यांना आता विधानसभा अध्यक्ष बनवण्याऐवजी प्रदेशाध्यक्ष बनवले जाणार आहे. बाबांचे चव्हाण घराणे हे गांधी कुटुंबीयांचे निष्ठावान म्हणून ओळखले जातात. त्यामुळे निष्ठावान घरण्याना कुठली तरी सुभेदारी देऊन पक्षाला तुमच्या सारख्या निष्ठावंताची गरज आहे हे दाखवण्याचा काँग्रेस पक्ष नेतृत्वाचा प्रयत्न आहे. पृथ्वीराज चव्हाण हे जरी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते तरी त्यांच्या कार्यकाळात पक्षाचा जनाधार काही वाढला नाही. कारण पक्षाचे सरकार असूनही आमदारांची तसेच कार्यकर्त्यांची कामे होत नव्हती. त्यामुळे अनेकांनी पक्षाला कायमचा रामराम करून दुसऱ्या पक्षाची वाट धरली. बाबांना मात्र कार्यकर्त्यांपेक्षा घरच्या शेतात पिकावलेल्या पालेभाज्या अधिक प्रिय होत्या. पण आता मात्र प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी अंगावर पडल्यास त्यांच्यावर पक्षाची संघटनात्मक ताकत वाढविण्याची अवघड जबाबदारी येऊन पडेल. आज काँग्रेस पक्ष जरी सतत असला तरी त्याचा पक्षाला फारसा फायदा झालेला नाही. त्यामुळे अजून तरी पक्षाची ताकत वाढलेली नाही, आता बाबा जर प्रदेशाध्यक्ष झाले तर ते कशा पद्धतीने पक्ष वाढवतात ते बघावे लागेल. तसे पाहता आज काँग्रेस राष्ट्रवादी सारखे धर्मनिरपेक्ष पक्ष वाढण्याची गरज आहे. कारण या देशाचा जो धर्मनिरपेक्ष चेहरा आहे तो टिकून राहिला तरच देशाची एकात्मता टिकून राहील. पण दुर्दैवाने तसे प्रयत्न होताना दिसत नाही. या बाबतीत काँग्रेसने पुढाकार घ्यायला हवा. पण काँग्रेसने मुस्लिमांना चुच करताना हिंदूंना दुखावले. त्यामुळेच दुखावलेला हिंदू समाज भाजपच्या गळाला लागला. वास्तविक शाहू, फुले, आंबेडकर यांच्या पुरोगामी महाराष्ट्रात संघ परिवाराच्या विचारांना थारा मिळणे हा इथल्या सामाजिक चळवळीचा पराभवच म्हणावा लागेल. अजूनही वेळ गेलेली नाही. काँग्रेसने सर्वांना एकत्र करण्याचा प्रयत्न करावा आणि संपूर्ण महाराष्ट्रात पूर्वी प्रमाणे सक्रिय व्हावे. कारण अजूनही महाराष्ट्रात गांधीवाद जीवंत आहे आणि तो या पुढेही जिवंत ठेवण्याचे काम पृथ्वी बाबा यांच्या सारख्या नेत्यांनी करायला हवे. पक्षीय राजकारण आता पुरे झाले. ते भविष्यातही करता येईल, पण त्यासाठी पक्ष जीवंत राहायला हवा. अन्यथा बाबांसाठी काँग्रेसचे अध्यक्ष हे ओसाड गावची पाटीलकी ठरेल.

मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३

कोषागारे दिन... काल व आज...

महाराष्ट्र शासनाने वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली १ जानेवारी १९६२ पासून लेखा व कोषागारे संचालनालयाची स्थापना करून कोषागाराचे नियंत्रण संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे विभागप्रमुख या नात्याने सोपविण्यात आले. १९६२ पूर्वी जिल्हा कोषागारे वित्त विभागाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली होती आणि शासन सचिव, वित्त विभाग हे जिल्हा कोषागारांचे विभागप्रमुख होते. यापूर्वी वित्त विभागाने १ एप्रिल १९५५ पासून जुन्या मुंबई राज्यातील कोषागारे महसूल विभागाकडून आपल्या नियंत्रणाखाली आणली. भुतपूर्व हैद्राबाद राज्यातील कोषागारे ही त्या शासनाच्या वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली होती व राज्य पुनर्रचनेनंतर, दिनांक १ नोव्हेंबर १९५६ पासून ती थेट मुंबई राज्याच्या वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली आली. तथापि विदर्भातील कोषागारे ही महसूल विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली होती ती १ जानेवारी १९५८ पासून वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली घेण्यात आली. राज्यातील सर्व जिल्हा कोषागारे ही संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत शासनाच्या वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणली. मात्र तहसीलच्या ठिकाणी असलेली उपकोषागारे महसूल विभागाच्या नियंत्रणाखाली होती.

ही उपकोषागारे संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणण्यासाठी दिनांक १ एप्रिल १९६४ रोजी २४ उपकोषागारांचा एक गट व दिनांक १ जून १९६८ रोजी ९८ उपकोषागारांचा आणखी एक गट वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणण्यात आला. आता राज्यातील सर्व २९० उपकोषागारे वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आहेत. दि. १ जानेवारी १९६२ पासून लेखा व कोषागारे संचालनालयाची स्थापना करण्यात आल्यानंतर शासनाच्या व्यवहारासंबंधीच्या लेख्यांचे काम पाहणारी सर्व जिल्हा कोषागार कार्यालये. वित्त विभागाचे कोषागार निरीक्षण पथक, अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई. संचालक, स्थानिक निधी लेखा, मुंबई यांचे कार्यालय. भांडार पडताळणी विभाग. लेखा कार्यालये (प्रशिक्षण), वित्त विभागातील दक्षता पथक शाखा इत्यादी कार्यालये व संलग्नित शाखा या संचालनालयाच्या नियंत्रणाखाली आणल्या. अधिदान व लेखा कार्यालय मुंबई या कार्यालयाची मुख्यालयाचे प्रदानाचे काम पार पाडण्यासाठी दिनांक १ एप्रिल १९५५ रोजी स्थापना करण्यात आली. हे काम यापूर्वी महालेखापाल, मुंबई यांच्याकडून पार पाडण्यात येत होते.

लेखा प्रशिक्षण कार्यालयाकडून कोषागार लिपिकांना आणि इतर विभागातील व कार्यालयातील लेखाविषयक कामकाज पार पाडणार्या लिपिकांना प्रशिक्षणांची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सध्या मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती येथे प्रशिक्षण वर्ग आहेत. १ जानेवारी १९६२ पासून लेखा व कोषागारे संचालनालय स्थापन झाल्यानंतर वित्त विभागास दुय्यम असलेल्या लेखा कार्यालयातील पर्यवेक्षकीय संवर्गाची पुनर्रचना वित्त विभागाखेरीज इतर शासकीय विभागाच्या २ प्रशासकीय नियंत्रणाखालील लेखाविषयक बाबीचे काम पाहणारी पदे विचारात घेऊन एकत्रित राज्यासाठी वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली शासनाने फेब्रुवारी १९६५ पासून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेची स्थापना केली. यामध्ये निरनिराळ्या शासकीय विभागांमधील लेखाविषयक कामे करणाऱ्या सर्व राजपत्रित व अराजपत्रित पर्यवेक्षी पदांचा समावेश करण्यात आला. यामुळे केवळ निरनिराळ्या शासकीय विभागांमध्येच नव्हे तर मंडळे, महामंडळे, प्रकल्प, विद्यापीठे, जिल्हा परिषदा, वाणिज्यिक विभाग, स्थानिक निधी लेखापरिक्षा कार्यालय इत्यादी मध्ये देखील लेखाविषयक व वित्तीय जबाबदारीची कामे करण्यासाठी पुरेशी अर्हता व अनुभव असलेले प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध होऊ शकतात. तसेच यामुळे कर्मचाऱ्याना सर्वांगीण अनुभव मिळण्याच्या दृष्टीने, त्यांची अदलाबदल करण्याची सोय उपलब्ध होते. १ फेब्रुवारी १९६५ रोजी या सेवेमध्ये एकूण ३७५ कर्मचारी होते. ही संख्या २५४० इतकी झालेली आहे. १ जानेवारी १९६२ पासून लेखा व कोषागारे संचालनालय स्थापन झाल्यानंतर पुणे व नागपूर येथे दोन प्रादेशिक कार्यालयेही स्थापन करण्यात आली. सन १९८० नंतर महसूल विभागाप्रमाणे प्रादेशिक कार्यालयाची पुनर्रचना करुन अमरावती, औरंगाबाद, नाशिक, कोकण विभाग अशी चार प्रादेशिक कार्यालये स्थापन करण्यात आली. उपसंचालक (सध्या सहसंचालक) लेखा व कोषागारे यांना प्रादेशिक विभागप्रमुख म्हणून घोषित करण्यात आले. भांडार पडताळणी शाखा लोकलेखा समितीने १९४४-४५ च्या विनियोजन लेख्यावरील लेखा अहवाल व केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक ९२८१/३३, दिनांक १६ ऑक्टोबर १९५२ अन्वये वित्त विभागाचा एक भाग म्हणून स्वतंत्र भांडार पडताळणी शाखेची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १ जानेवारी १९६२ पासून स्थापना करण्यात आलेल्या लेखा व कोषागारे संचालनालयाकडे वित्त विभागाची भांडार पडताळणी शाखा विलीन करण्यात आली. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक डीएटी-१०६४/५८४/सी-१२ दिनांक १ फेब्रुवारी १९६५ अन्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा दिनांक १ फेब्रुवारी १९६५ स्थापन करण्यात आली आणि भांडार पडताळणी अधिकारी व भांडार निरीक्षक या पदांचा उक्त सेवेच्या अनुक्रम गट-ब व गट-ब (अराजपत्रित)मध्ये अंतर्भाव करण्यात आला. भांडार पडताळणी शाखेमार्फत शासनाच्या विविध विभागीय कार्यालयाच्या ताब्यातील साठ्यांची व भांडारांची पडताळणी केली जाते. राज्य अभिलेख देखभाल अभिकरण केंद्र शासनाने दिनांक ०१/०४/२००४ पासून लागू केलेली नवीन परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना महाराष्ट्र राज्यात लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला. या निर्णयास अनुसरुन दिनांक ०१/११/२००५ पासून सदर योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक ३१/१०/२००५ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले. सदर योजने खालील कपाती प्रत्यक्षात सप्टेंबर, २००७ पासून सुरु झाल्या असून पूर्वीच्या कालावधीतील थकबाकी प्रत्येक महिन्यासोबत एक महिना या प्रमाणे करण्यात येत आहे.

या योजनेखाली २४९२७९ एवढ्या शासकीय कर्मचाऱ्याची नोंदणी झाली आहे व्हर्चुअल ट्रेजरी ३ महाराष्ट्र शासनाच्या कर व करेत्तर रकमा 'इंटरनेट बँकींग' सुविधेचा वापर करुन करदात्यांना इलेक्ट्रॉनिक पध्दतीने भरता याव्यात, यासाठी शासन वित्त विभागाने 'शासकीय जमा लेखांकन पध्दत (GRAS) ही प्रणाली विकसित केली आहे. बिम्स, बील पोर्टल, सेवार्थ या प्रणालीमधून संगणीकृत देयके तयार केली जातात. पारित झालेली देयकांची रक्कम EFT, NEFT व उचझ व्दारे संबंधित आहरण व संवितरण अधिकारी आणि लाभधारकांच्या बँक खात्यावर जमा केली जाते. तसेच निवृत्तीवेतनधारकाचे पुरवणी, मासिक निवृत्तीवेतन आणि निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरणाची रक्कम सुध्दा उचझ व्दारे सरळ त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येत आहे.

SMS व्दारे निवृत्तीवेतन धारकानां प्रथम ओळखपत्रासाठी संदेश देणे, मासिक, पूरवणी निवृत्तीवेतन देयक कोषागारात जनरेट झाल्याबरोबर sms जाणे, हयात प्रमाणपत्राची संगणात नोद घेतल्यानंतर त्वरीत निवृत्तीवेतनधरकानां हयात प्रमाणपत्राची नोंद घेतल्याचा संदेश जाणे इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. कोषवहिनी, अर्थवाहिनी व्दारे जिल्हा निहाय जमा व खर्च, आहरण व संवितरण अधिकारी निहाय जमा व खर्च, लेखाशिर्ष निहाय जमा व खर्च, कोषागारात दाखल केलेल्या देयकाचा स्टेटस इत्यादी अनेक प्रकारची अद्यावत माहिती मिळू शकते. सर्वसाधारण जिल्हयामध्ये महाराष्ट्र वित्त व लेखा सवंर्गातील वेगवेगळया विभागात संवर्गातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची किमान १०० पदे कार्यरत असतात.

- अण्णाराव भुसणे

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

01 TO 07 FEB 2021 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 30/01/2021 9:39 PM Page 1

आदिवासी संस्कृतीचे जतन आणि संवर्धनाची गरज -राज्यपाल कोश्यारी

मुंबई/प्रतिनिधी

समाजाने आदिवासींपासून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. आदिवासी संस्कृती समृद्ध असून आदिवासी संस्कृतीचे रक्षण करुन त्याचे संवर्धन करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी केले. गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाचा ८ वा दीक्षांत समारंभ राज्यपालांच्या दूरस्थ उपस्थितीत गुरुवारी (दि. २८) झाला, त्यावेळी राजभवन, मुंबई येथून सहभागी होताना राज्यपाल श्री.कोश्यारी बोलत होते. राष्ट्रीय मुल्यांकन आणि मान्यता परिषदेचे (नॅक) अध्यक्ष डॉ. एस सी शर्मा, विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू प्रो. श्रीनिवास वरखेडी, विद्यापीठाच्या विविध प्राधिकर मंडळांचे सदस्य, विभाग प्रमुख, प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

स्नातकांचे अभिनंदन करताना राज्यपाल श्री.कोश्यारी म्हणाले, आदिवासी बहुविध प्रतिभेचे धनी आहेत. आदिवासी पर्यावरणाशी सुसंगत अशी जीवनशैली जपतात. दोन वर्षापूर्वी चंद्रपूर येथील आदिवासी मुलींनी एव्हरेस्ट शिखर सर केले होते. आदिवासींची कला व हस्तकला देखील समृद्ध आहे. त्यांचे जतन व संवर्धन करणे गरजेचे आहे. आदिवासी क्षेत्रातील बांबूपासून तयार केलेल्या उत्पादनांचा प्रचार-प्रसार केल्यास आदिवासी आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होतील. युवकांना रोजगारासाठी बाहेर जावे लागणार नाही. त्यामुळे आत्मनिर्भरतेची सुरुवात गोंडवाना विद्यापीठापासून आणि विशेषतः आदिवासींपासून करावी. गोंडवाना विद्यापीठाने शासनाच्या विविध योजना जिल्ह्यात साकार करण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करावे, अशीही सूचना राज्यपाल श्री.कोश्यारी यांनी यावेळी केली.

विद्यापीठातील स्नातकांनी तसेच विद्यार्थ्यांनी केवळ पदवी प्राप्त करून समाधान न मानता चारित्र्य संपन्न नागरिक व्हावे. पर्यावरण रक्षणासह विद्यार्थ्यांनी समाजसेवा व देशसेवा करावी. विद्यापीठातील अध्यापकांचे, चिंतन आणि मनन चांगले असेल तर विद्यार्थ्यांचे अध्ययन देखील चांगले होईल, असे राज्यपाल कोश्यारी यांनी सांगितले. गोंड समाज हा मध्य भारतातील सर्वात मोठा आदिवासी समूह असून त्यांचे पारंपरिक ज्ञान व कौशल्य जतन केले पाहिजे असे राष्ट्रीय मुल्यांकन आणि मान्यता परिषदेचे (नॅक) अध्यक्ष एस सी शर्मा यांनी सांगितले. कुलगुरू श्रीनिवास वरखेडी यांनी विद्यापीठाचा अहवाल सादर केला. पदवीदान समारोहात विद्यार्थ्यांना आचार्य पदवी तसेच प्राविण्यप्राप्त विद्यार्थांना सुवर्णपदके प्रदान करण्यात आली.

पिस्तुल व चाकूचा धाक दाखवून दरोडे टाकणाऱ्या टोळीला मुद्देमालासह अटक

उल्हासनगर/प्रतिनिधी

पंधरा दिवसापुर्वी भवानी ज्वेलर्स,सर्वादय नगर अंबरनाथ येथे दुपारी १.३० वाजेच्या सुमारास ४ इसमानीं मोटरसायकलवर येऊन दुकानाचे मालक व त्यांचे साथीदार यांचेवर पिस्तुलाने फायरिंग करीत तसेच चाकुने वार करीत २० ते २५ तोळे सोन्याची जबरी चोरी करुन पसार झाले होते. त्यात ज्वेलर्स दुकानाचे मालक भैरवसिंग राजपुत जखमी झाले होते. तेव्हा त्याच्या फिर्यादीवरुन अंबरनाथ पोलीस स्टेशनला गु.र.नं ५४/२०२१ भा.द.वी कलम ३९४,३९७,३४ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५,२७ सह महा.पोलीस कायदा कलम ३५(१)(अ),१३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्यामुळे कल्याण पुर्व प्रादेशिक विभागाचे अप्पर पोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे, उल्हासनगर परिमंडळ ४ चे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते,अंबरनाथ विभागाचे सहा पोलीस आयुक्त विनायक नरळे यांनी

घटनास्थळी भेट देऊन गुन्हाचा सखोल तपास करण्याचे आदेश दिले होते. वरिष्ठांच्या सुचनाच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय धुमाळ आणि पो.नि.(गुन्हे) संजय बेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरणाचे अधिकारी पोलीस उप निरिक्षक हर्षल राजपुत, प्रविण खोचरे, उल्हास जाधव यांच्या पथकाने अतिशय शिताफीने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदाराच्या आधारे कौशल्यपुर्वक तपास करुन मोनु विश्वकर्मा वय २२, धिरज सर्वगोडे वय २३, दिवेश सिंग वय २५ या तिघांना शिताफीने अटक करुन त्यांचे कडुन एक मंगळसुत्र, ४ चैन अशा एकुण पाच तोळे सोने चार मोबाईल ऐवढा मुद्देमाल हस्तगत केला आहे. अटक केलेल्या आरोपी पैकी दिवेश सिंग या गुन्हातील मुख्य फरार आरोपी याचा भाऊ असुन दिवेशने मुख्य आरोपीला फरार करण्यात मदत केली असल्याचे बोलले जात असुन मुख्य आरोपीस लवकरच अटक करण्यात येईल असे पोलीसांकडुन खात्रीलायक रित्या सांगितले जात आहे.वरिल गुन्हाच्या तपासा दरम्यान भा.द.वि कलम २०१, २१२ वाढविण्यात आले आहे. पोलिसांनी त्वरित कारवाई करत आरोपींना अटक केल्याबद्दल नागरिकांमधुन कौतुकाचा वर्षाव होत आहे.

देवणी तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी अजित बेळकोने यांची निवड



देवणी/प्रतिनिधी

माजी मंत्री दिलीपराव देशमुख, लातुर जिल्हाचे पालकमंत्री अमित देशमुख, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस अशोक पाटील निलंगेकर, मल्लीकार्जुन मानकरी,जिल्हा अध्यक्ष श्रीशैल्य उटगे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका अध्यक्ष निवडीचा प्रस्ताव प्रातांध्यक्ष बाळासाहेब थोरात साहेब यांच्याकडे पाठवण्यात आला होता. त्यास त्यांनी मंजुरी पत्र देऊन नुतन तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्ष पदी अजित बेळकोने यांची निवड करण्यात आली. निवड झाल्याबद्दल अजित बेळकोने यांनी मल्लिकार्जुन मानकरी यांच्या निवासस्थानी भेटुन आशिर्वाद घेतले आणि मानकरी यांच्या वतीने त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले. यावेळी सोबत माजी सरपंच काशीनाथ मानकरी, विजयकुमार मानकरी, सुभाष पाटील, अमित मानकरी, प्रताप कोयले, योगेश ढगे, राहुल बालुरे, तानाजी कांबळे, नामदेव मुराळे, शंकर पाटीलसह उपस्थिती होती.

गॅस सिलिंडरवरील सबसिडी पूर्ववत करून पेट्रोल आणि डिझेल दरवाढ रद्द करावी!

उदगीरात 'मनसेन'चे उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

देवणी/प्रतिनिधी

गोरगरीब सर्वसामान्य ग्राहकांना वर्षाला १२ घरगुती गॅस सिलेंडर केंद्र शासनामार्फत सबसिडी खातर काही रक्कम दिली जाते. त्यानुसार सरासरी ७०० ते ८०० रुपये गॅस सिलेंडरचे भाव असल्यास प्रति सिलेंडर मागे २०० ते २५० रुपये सबसिडी दिली जात होती. ही सबसिडी ग्राहकांच्या बँक खात्यावर जमा केली जात असे. परंतु ऑगस्ट २०२० महिन्या पासून गॅस सिलिंडरच्या किमतीत सरासरी ७०० रुपयेच्या घरात आहेत व त्यावर दिली जाणारी सबसिडी ही केवळ ८ रुपये १० रुपये दिले जात आहे. तसेच गेल्या महिन्याभरात पेट्रोल व डिझेलच्या किंमतीमध्ये तब्बल २० वेळा दरवाढ झालेली असून प्रति लिटरमागे पाच ते सहा रुपये डिझेल व पेट्रोलच्या किमती वाढलेल्या आहेत. इंधन दरवाढीमुळे प्रचंड महागाई वाढलेली असून गोरगरीब सर्वसामान्याना या दरवाढीचा प्रचंड फटका बसलेला आहे. अगोदरच लॉकडाऊनमुळे सर्वसामान्य जनतेचे हाल झाले आहे. त्या शासनाकडून दिलासा देण्याऐवजी उलट गॅस सिलेंडर सबसिडी बंद करून व पेट्रोल डिझेल वरील दर वाढवून त्यांची परीक्षा पहिली जात आहे. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून केंद्र शासन व राज्य शासनाचा निषेध करत असून शासनाने गॅस सिलिंडरवरील सबसिडी पूर्ववत करावी व डिझेलच्या किमतीत झालेली दरवाढ कमी करून गोरगरीब सर्वसामान्य जनतेला दिलासा द्यावा अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना शाखा उदगीर या सर्व इंधन दरवाढीच्या विरोधात व गॅस

सिलेंडर सबसिडी मिळवून देण्यासाठी विविध आक्रमक जनआंदोलने हाती घेईल असे उदगीरात मनसेनेचे उप जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हणले आहे. या निवेदनावर संजय राठोड उपजिल्हाध्यक्ष, संग्राम रोडगे तालुकाध्यक्ष, अभय सूर्यवंशी शहराध्यक्ष, संतोष बोईले उपजिल्हाध्यक्ष मनविसे, बालाजी धोत्रे तालुका अध्यक्ष मनविसे, रामदास पाटील तालुका अध्यक्ष शेतकरी सेना, अमोल गाजरे शहर सचिव, संतोष भोपळे शहर उपाध्यक्ष, श्रीकांत बिरादार शहर उपाध्यक्ष, सतीश चव्हाण तालुका उपाध्यक्ष, धोंडीराम विभाग अध्यक्ष, दयानंदडोंगरे तालुका अध्यक्ष कामगार सेना, रोहित बोईनवाड शहर उपाध्यक्ष मनविसे, नामदेव राठोड, गणेश चिद्रेवार, गोविंद केंद्रे, गजानन तळभोगे, बबलू तरवडेंच्या सह्या आहेत.

सिद्धेश्वर साखर कारखाना येथे उसाच्या वाहनांना परावर्तिका

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूर येथील श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना कुमठे येथील कारखान्याच्या कार्यस्थळावर सोलापूर पोलीस आयुक्तालय सोलापूर शहरच्या वतीने ३२ व्या रस्ता सुरक्षा जनजागृती अभियानांतर्गत ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना परावर्तिका (रिफ्लेकटर) लावण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी सोलापूर शहर वाहतूक शाखेच्या सहाय्यक पोलीस आयुक्त रुपाली दरेकर, कारखान्याचे कार्यकारी संचालक समीर सलगर आणि पोलीस अधिकारी यांच्या हस्ते ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना परावर्तिका लावण्यात आली आहे. यावेळी कारखान्याचे सचिव सिद्धेश्वर शिलवंत, सुरक्षा अधिकारी एन डी पाटील, शेतकी अधिकारी हणमंत बिराजदार, श्याम गायकवाड तसेच वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक प्रवीण कुलकर्णी, सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुल मोहिते, पोलीस उपनिरीक्षक अमितकुमार करपे, रमेश चिंताकींदी, कारखान्यातील अधिकारी, कर्मचारी, ऊस वाहतूक करणारे वाहन चालक, बैलगाडी वाहतूकदार आदी उपस्थित होते.

याप्रसंगी सोलापूर शहर दक्षिण वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष काणे यांनी दरवर्षी रस्ते अपघातामध्ये मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांचे प्रमाण अधिक असल्याचे सांगून सर्वांनी रस्ता सुरक्षिततेचे नियम पाळावेत. वाहन चालवताना मोबाईलचा वापर करू नये, टेप रेकॉर्डर मोठ्या आवाजात लावू नये, अशा सूचना वाहनचालकांना केले आहेत. सुरक्षिततेचे नियम पाळण्यामध्ये सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना नेहमीच सहकार्य करीत असल्याचे यावेळी सांगितले.

वसईत शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त महाआरोग्य शिबीर संपन्न

वसई/प्रतिनिधी

शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिवसेना व शिवप्रेरणा फाउंडेशनचे, संस्कार सेवा आयोजित महाआरोग्य शिबिर कार्यक्रमाचे आयोजन विभागप्रमुख, अध्यक्ष प्रशांत कदम व कार्याध्यक्ष, तालुका संघटक योगेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाआरोग्य शिबीराचे आयोजन मोठया उत्स्फूर्तपणे संपन्न झाला. शनिवार दि.३० जानेवारी पारनाका वसई येथील आरपीवाघ हायस्कुल येथे महाआरोग्य शिबीर व दिनदर्शिका २०२१ चा प्रकाशन सोहळा आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरास वसईकर जनतेने भरघोस प्रतिसाद दिला. सदर शिबिरास शिवसेना सहकार नेते नितीन म्हात्रे, पालघर जिल्हा शिवसेना सचिव मिलिंद खानोलकर, सुप्रसिद्ध चित्रकार

सुभाष गोंधळे, वसई तालुका प्रमुख निलेश तेंडोलकर, मनपा गटनेत्या सौ किरण चेंदवणकर, वसई शहर प्रमुख प्रथमेश राऊत, किरण शिंदे, भुपेश राऊत, दिलीप सुर्वे,कैलाश पडवळ, जगदेश खामकर, नरेश पुलिपत्ती, सुनील राऊत, राहुल कांबळी, ओमकार भोपाळगडे,ललित भिडे, मारुती झुंजूरकर ऋतिक शिंदे, मंगेश म्हस्के, विनायक आठवले, राजन पाटील यांच्या प्रमुख उपस्थिती महाआरोग्य शिबीराला नागरिकांनी प्रतिसाद दिला.

सासऱ्याचा खून करणाऱ्या जावयास जन्मठेप

लातूर : सासऱ्याचा खुन करणाऱ्या जावायास लातूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश वाय. पी. मनाठकर यांनी भादवि ३०२ अन्वये जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. १५ जुलै २०१८ रोजी रात्री नऊच्या सुमारास चाकूर येथील बोथी चौकात मयत भीमराव व्यंकट नंदगाव आला असता आरोपी पुंडलीक गोविंद काळे या दोघांत वाद झाला. आरोपी पुंडलिक काळे यांनी त्यांच्या सोबत आणलेल्या कोयत्याने सासऱ्याचा हातावर गळ्यावर वार करून खून केला. सदर घटनेबाबत मयताचा भाऊ विजयकुमार भीमराव नंदगाव यांनी चाकुर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीच्या अनुषंगाने आरोपी पुंडलिक काळे विरोध चाकुर पोलीस ठाण्यात ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक रामेश्वर तट यांनी केला. त्यांनी या खून प्रकरणाचा आभ्यापुर्ण तपास करून आरोपी विरोधात सबळ पुरावे गोळा करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. या प्रकरणी सरकारी पक्षातर्फे आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरिता एकूण ९ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. सदर खून खटल्यातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष व परिस्थितीजन्य पुरावा ग्राह्य धरून लातूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश वाय.पी. मानाठकर यांनी आरोपी पुंडलिक गोविंद काळे यात दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली. या प्रकरणी सरकारी पक्षातर्फे वकील संतोष देशपांडे यांनी काम पाहिले त्यांना समन्वयक व पैरवी पहिले राठोड, एस.आर.कोरे, दिलीप नागराळे यांनी सहकार्य केले.

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती 'अे', बोळींज

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय बोळींज येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत हितसंबंधच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय बोळींज येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र	दिनांक	वॉर्ड क्रमांक/ मालमत्ता क्रमांक	ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्याचे नाव किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव	खरिदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव	मालमत्तेचे स्वरूप	पत्ता
१.	१९/०१/२०२१	BL ०७/२०६/३०	संतोष विठ्ठल वाडेकर	स्वप्नील रमेश पालव / सान्वी पालव	निवासी	राजगुलमोहर इमारत नं.०३ रूम नं.बी/३०३ बोळींज
२.	१९/०१/२०२१	BL ०७/२१३/१	बाळकृष्ण इंटरप्रायजेस / प्रिती महेश छेडा	मनोहर रडक्या भोईर	निवासी	श्याम प्लाझा रूम नं. ०१, वाय के नगर बोळींज
३.	१९/०१/२०२१	BL०७/२३९/११४	ए.के. कंन्ट्रक्शन/ मोनिका विनोद कनोजिया	प्रकाश एकनाथ केकाणे	वाणिज्य	वाय के नगर न्यु विवा कॉलेज रोड, सिद्धीविनायक टॉवर, दुकान नं. २३
४.	१९/०१/२०२१	BL ०७/९५/१२	सर्त्यावर निहालसिंग यादव/ धनवंती यादव	दिपक सखाराम वरपे	निवासी	स्टार डिवाईन रूम नं.ए/२०४, तिरूपती नगर रोड
५.	१९/०१/२०२१	BL ०६/१९२/३१	गौरव महेंद्र सावटे	समिक्षा मुकेश जैन / मुकेश मोहनलाल जैन	निवासी	गोकुळ टाऊनशिप रूबी इ. नं. ०१ रूम नं. ४०१
६.	१९/०१/२०२१	BL ०७/२५९/५१	विनोद जी मुवनकरा / पुर्णिमा व्ही. मुवनकरा	रोशन पदमकुमार अंचन / अर्पना रोशन अंचन	निवासी	वाय के एन एक्स पॅराडाईज पार्क बि.नं.४ रूम नं बी/५०४
७.	१९/०१/२०२१	BL ०७/१६५/५२	अभिजीत चक्रवोती	सुमती धनेश घरत / धनेश पांडुरंग घरत	वाणिज्य	यशवंत गॅलेक्सी दुकान नं. ०८ वाय के नगर
८.	१९/०१/२०२१	BL ०३/२२६/२९	उमेश अशोक परब	मनिष हरिराम गुप्ता / सविता मनिष गुप्ता	निवासी	पद्मावतीनगर से.नं.४ इ.क्र.२ रूम नं. बी/१०५, बोळींज
९.	१९/०१/२०२१	BL ०३/३२०/४	नवीन मिश्रा	प्रणित चंद्रकांत पवार / सिया प्रणित पवार	निवासी	पुष्पा पार्क पद्मावतीनगर रूम नं. ०४ बोळींज
१०.	१९/०१/२०२१	BL ०६/१४२/७०	मनजित कौर कोहली / हरिंदर सिंग कोहली	नाहिद मेहताब अहमद	वाणिज्य	यशवंत दिप दुकान नं.१५ गोकुळ टाऊनशिप, बोळींज

जा.क्र. : वविशम/बो-कर १४७५/२०२०-२१
दिनांक : २७/०१/२०२१

सही/-
सहा.आयुक्त
प्रभाग समिती 'अे', बोळींज
वसई-विरार शहर महानगरपालिका

01 TO 07 FEB 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 30/01/2021 9:39 PM Page 1

खासदार राजेंद्र गावितांनी घेतला वाड्यातील प्रश्नांचा आढावा

नगरपंचायत तीन वर्षात सार्वजनिक शौचालयही बांधू शकली नाही हे खेदजनक

वाडा/प्रतिनिधी

पालघरमधील वाडा नगरपंचायतीच्या निर्मितीला तीन वर्ष झाली असून याकाळात नगरपंचायत साधं सार्वजनिक शौचालय बांधू शकली नाही हे खेदजनक असल्याची टीका पालघरचे शिवसेना खासदार राजेंद्र गावीत यांनी वाड्यातील आढावा बैठकीत केल्यानं नगरपंचायतमधील सत्ताधारी शिवसेनेला घरचा आहेर मिळाला आहे. खासदार गावीत यांनी वाड्यातील विविध प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक घेतली.

यावेळी वाडा नगरपंचायतीकडे कोट्यावधी रुपयांचा निधी येवूनही एकही विकासकाम होऊ शकलेले नाही. महिलांकरिता सार्वजनिक शौचालयाची मागणी गेली अनेक वर्ष होत असताना नगरपंचायत प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचं उघड झाल्यानं खासदार गावीत या बैठकीत चांगलेच संतापले. त्यांनी महिलांप्रती असंवेदनशीलता दाखवणाऱ्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले.

या बैठकीदरम्यान नागरिकांनी विविध समस्या उपस्थित केल्याने त्यांनी महावितरण, पोलीस, सार्वजनिक बांधका विभागाच्या अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावले. तर तीन महिन्यांच्या आत सौचालय, मुतारी व पाणपोईच्या सोय करण्याचे सांगून सध्या असलेल्या भाजी मार्केटचा नव्याने विकास करून भाजी, मच्छी, मटण विक्रेत्यांची सोय करण्यासाठी प्रयत्न करण्याचे सुचवले. बैठकीत नगरसेवक रामचंद्र जाधव व संदीप गणोरे यांच्यासह इतर नगरसेवकांनी नगरपंचायतीच्या अडी अडचणी अवगत करत कायम स्वरूपी मुख्याधिकारी देण्याची मागणी केली. या बैठकीतभिवंडी (ग्रा.)चे आमदार शांताराम मोरे, तहसीलदार उद्धव कदम, मुख्याधिकारी प्रसाद बोरकर, नगराध्यक्षा, गीतांजली कोलेकर नेते निलेश निलेश गंधे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पॅरामेडिकल कॉलेज येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

वाडा/प्रतिनिधी

बबन मोरे चॅरिटेबल ट्रस्ट वाडा संचलित नॅशनल पॅरामेडीकल कॉलेज अंतर्गत यशोतेज कौशल विकास केंद्र वाडा येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डीएमएलटी व नर्सिग आदी कोर्सेसच्या विद्यार्थ्यांनी ध्वजसंहिता नुसार संविधान वाचन, ध्वजारोहण, राष्ट्रीय सलामी, राष्ट्रगीत, ध्वजप्रतिज्ञा, ध्वजगीत, देशाभिमानाच्या घोषणा देऊन अतिशय उत्साहत प्रजासत्ताक दिन साजरा केला. सदर कार्यक्रमासाठी ध्वजारोहण सन्माननिय अतिथी राजेश डेंगाणे (एसपी हवालदार, टॅन्क (रणगाडे) ऑपरेटर (इसार हरियाना) तील सेवेतील अधिकारी यांच्या हस्ते झाले. ते वाडा येथील शिवाजीनगरचे रहिवासी आहेत . ते सद्या इसार हरियाना (आर्मी) येथे सेवेत आहेत.तर प्रमुख पाहूणे म्हणून मधुकर भानुशाली, पी.जे. हायस्कूल वाडाचे कार्यकारी कमिटी सदस्य विजय आंबवणे सामाजिक कार्यकर्ते वाडा तसेचे संस्थेचे सचिव सुनिता मोरे, संस्थेचे अध्यक्ष रविंद्र बबन मोरे यांनी उपस्थिती दर्शविली. नॅशनल पॅरामेडीकल कॉलेज मधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व कॉलेज मधील विद्यार्थी वर्गाने विशेष परिश्रम घेऊन हा राष्ट्रीय सण साजरा केला. कार्यक्रमांचे सुत्रसंचालन अध्यापिका अमरिन शेख यांनी केले व आलेल्या पाहुण्यांचा सन्मानचिन्ह देउन शाल श्रीफळ ने संस्थेकडुन सत्कार करण्यात आला व संस्थेच्या सचिव सुनिता मोरे यांनी पाहूण्याचे, विद्यार्थ्यांचे सर्वाचे आभार मानुन पाहूण्याचे हस्ते खाऊचे वाटप होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

पान १ वरून....

प्रियकरामुळे जीवन तिचे उध्वस्त झाले...

या प्रकरणी अहमदपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून रोहित रणधीर पाटील (वय २२ वर्ष) असे या नराधमाचे नाव आहे.

याबाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेली माहीती अशी की मौजे चोबळी तालुका अहमदपूर येथील रहिवासी असलेल्या रोहित रणधीर पाटील (वय २२ वर्षे) या मुलाने गावातीलच २० वर्षीय मुलीस मागील दीड वर्षापासून आपल्या प्रेमाच्या जाळ्यात अडकवीले होते. रोहितने तिला लग्नाचे आमिष दाखवून १९ ऑगस्ट २०२० रोजी मध्यरात्री बारा वाजण्याच्या सुमारास मोटार सायकलवरून रांजणगाव पुणे येथे घेवून गेले होते. त्या ठिकाणी ढोके शेठ या व्यक्तीच्या घरी तीन महिने रोहित ने त्या मुलीस ठेवून घेतले. या तीन महिन्यात त्या मुली सोबत रोहितने प्रेमाच्या जाळ्यात अडकवून वेळोवेळी शारीरिक संबंध ठेवले. त्या मुलीने लग्न न करता शरीर संबंध ठेवणे योग्य नसल्याचे सांगूनही ,आपण लवकरच लग्न करू असे आमीष दाखवून शारीरिक संबंध ठेवले. त्या मुलीने लग्नाचा तकादा लावल्याने लग्न आपण दुसऱ्या ठिकाणी करू असे सांगून रोहित ने तिला आळंदी येथे नेले. आळंदी येथे लग्न करूत म्हणता म्हणता तीन महिने निघून गेले पण रोहित ने त्या मुली सोबत लग्न केलेच नाही. या कालावधीत ती मुलगी गरोदर झाली. यावेळी आपल्याला लग्ना अगोदर मुल नको असा रोहित ने दबाव टाकत जबरदस्तीने तिला दोन महिण्याची गरोदर असताना गोळ्या खाऊ घालून मूल जन्म घेण्याच्या अगोदरच त्या निष्पाप मुलाला मारून टाकण्यात आले. या सहा महिन्यापूर्वी तिच्यावर जबरदस्ती ने शारीरिक संबंध ठेवल्याचा अर्जात उल्लेख असून लग्नाचे आमिष दाखवून शरीर संबंध करत असताना अश्लील फोटो रोहितने आपल्या मोबाईल मध्ये काढून घेतले व अन्य कोणासोबतही तुझे लग्न होऊ देणार नाही अशी धमकी दिली. २२ जानेवारी २०२१ रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास रोहित चा भाऊ राहुल हा आळंदी येथे आला व आम्हा दोघांना गावाकडे घेऊन आला. गावात आल्यानंतर रोहितचे चुलते संजय पाटील याने घरी जा असे म्हणून मला रोहित पासून वेगळे केले. रोहितने १९.ऑगस्ट २०२० ते २२ जानेवारी २०२१ या कालावधी दरम्यान लग्नाचे आमिष दाखवून वारंवार माझ्यावर राजनगाव व आळंदी येथे बलात्कार केला असल्याची तक्रार पीडित मुलीने ने दिल्यावरून अहमदपूर पोलिस ठाण्यात आरोपी विरोधात भादस १८६० नुसार ३७६, ३१३, ५०६ नुसार २ गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी रोहित रणधीर पाटील हा फरार आहे. या प्रकरणाच्या तपसाबाबत आमच्या प्रतिनिधीने तपासधिकाऱ्यांकडून अधिक माहीती घेतली असता आरोपीच्या मागावर पोलिसांचे एक पथक रवाना केले असून लवकरच आरोपीला गजाआड केले जाईल असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपविभागीय अधिकारी बलराज लंजिले व पोलिस निरिक्षक सुनिल बिर्ला यांच्या मार्ग दर्शनाखाली पोउपनि.एन.व्ही.जाधव हे करीत आहेत.

समझोत्यासाठी बोलावून विरोधकांनी...

बंदोबस्त ठेवण्यात आला असला तरी गटातटातील हेवेदावे आणि अंतर्गत वाद हा उफाळून आलाच. जय पराजय हा तेवढयापुरते असायला हवे. परंतू समोरची व्यक्ती निवडणूक जिंकली आणि आपण हरलो तरी ती हार खुल्या मनाने स्विकारण्याची मानसिकता असायला हवी. ती सध्या कुणाकडेच दिसून येत नाही. संदीप मागाडे या तरूणाचा या राजकीय वादातून विनाकारण बळी गेला. वाद मिटवायला गेलेल्या संदीप मागाडे याच्यावर वीस जणांच्या टोळक्याने कोयत्याने आणि तलवारीने वार करीत अक्षरश: त्याच्या शरीराची चाळण केली.या घटनेची माहिती शिवाजीनगर पोलीसांना समजाताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. संशयीत आरोपी घटनास्थळावरून पळून गेल्याने या घटनेने गावातील वातावरण तणावपूर्ण बनले होते म्हणून संशयीत मारेकऱ्याचा शोध घेणे गरजेचे होते.

कबनुर ग्रामपंचायतची निवडणूक ही पूर्वीपासूनच गट तट यांचेत होत होती.या ग्रामपंचयातीवर बऱ्याच वेळेला राजकारणातील वरिष्ठ नेत्यांचे वर्चस्व राहिले आहे.यावेळी ही त्याच्या अधिपत्याखाली ग्रामपंचयात राहिली आहे.राजकीय वर्चस्व वाद हा येथे जपला जात असल्याने निवडणूकीला रंग भरला जात असे. कबनूर येथील हराटे भाग सिध्दार्थनगर परिसरात राहत असलेला तरूण संदीप सुरेश मागाडे हा २७ वर्षीय तरूण देखिल या निवडणूकीत जोमाने कामाला लागला होता.तो रॅपिअर मागावर काम करीत होता. अजून तो अविवाहित असल्याने त्याच्या मागे त्याचे आई, वडिल, भाऊ, बहिण असा परिवार आहे. तो आपल्या पॅनेलच्या उमेदवाराचा प्रचार प्रमुख होता.तो सिध्दार्थनगर भागात आपल्या उमेदवाराचा याचा प्रचार करीत होता.तर त्याच वार्डात त्याच्या विरोधात कुमार कांबळे याच्या घरातील एक जण निवडणूक लढवित होता. दोघांचे ही प्रमुख कार्यकर्ते हे आपआपल्या उमेदवाराना निवडून आणणे करीता कामाला लागले होते.जो तो आपल्या उमेदवाराचा प्रचार करीत असताना ठासून येणार आणि घासून येणार हे सांगत होते. प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या निवडणूकीच्या अगोदरपासून राजकीय डावपेच दोन्ही बाजूकडून आखले जात असल्याने आम्ही जिंकणारच ही भावना उमेदवारांची आणि त्याच्या कार्यकर्त्याची होती.

१५ जानेवारीला मतदान होणार होते. मतदानाच्या दिवसापर्यत ही राजकीय चर्चा रंगत होती. प्रचाराच्या वेळी कुमार कांबळे आणि संदीप मागाडे याच्यात तू तू मै मै झालेली होती.दोन्ही गटाकडून बलाबल दाखवले जात होते.कुणाल कांबळे याचा आतेभाऊ संदीप हे दोघे जण आपल्या उमेदवाराचा त्याचा हिरहिरीने प्रचार करीत होता. कुमार कांबळे याच्याकडून ही रवी कांबळे, रमजान सनदी, मुदस्सर घुणके अशी आदी कार्यकर्त्याची फळी होती. प्रचाराच्या वेळी या दोन्ही गटातील कार्यकर्त्यात बाचाबाची मुद्दयावरून गुद्दयावर आलेले होते.दोन्ही बाजूने मतदारांना आकर्षीत करणेसाठी वेगवगेळी प्रलोभने दाखवली जात असतानाच आर्थिक उधळण ही केली जात होती. विकास किंवा भागातील समस्या यावर चर्चा न करता दोन्ही बाजूकडून रात्रीस मतदारासाठी पार्टीचे आयोजन करण्यात येत होते. त्यामुळे किती मतदार आपल्या बाजूला आहेत. कुणी कोणत्या घरातील व्यक्ती कुणाच्या बाजूने फिरत आहेत याचा अंदाज दोन्हीकडच्या कार्यकर्त्यांना आलेला होता. आर्थिक बाबीवर जास्त भर दिला गेल्याने दोन्हीकडून राजकीय वर्चस्ववाद वाढविण्यावर भर देण्यात आलेला होता. त्यामुळे मतदान फोडण्यात दोन्ही कडचे कार्यकर्ते लागलेले होते. याच गोंधळात १५ जानेवारी रोजी मतदान पार पाडले.

निकाल आपल्या बाजूने लागेल असे दोन्ही उमेदवाराना वाटत होते. परंतू निवडणूक म्हटले की हार जीत ही ठरलेली असते. त्याचवेळी कोल्हापूर येथे निकालाच्या दिवशी दोन्ही कडचे कार्यकत्यांनी गर्दी केलेली होती.निकाल कुमार कांबळे याच्या उमेदवाराच्या विरोधात गेल्यानंतर हे संदीप मागाडे आणि त्याचा उमेदवार याच्यावर गुलालाची उधळण होत होती. त्यावेळी बघून कुमार कांबळे आणि त्याचा कार्यकर्ता शाहरूख मोठा यांनी संदीप मागाडे याच्याशी वाद घालीत त्याला बघून घेण्याची भाषा केली. त्यावेळी संदीपनेही त्यांना जशास तसे उत्तर दिले होते. हाच राग मनात धरून शनिवार दि.२३ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास संदीप मागाडे आणि मोठा शहारूख याचेत वाद झाला होता. वादाने वाद वाढला होता. तो मिटण्याची कोणतीच चिन्हे दिसत नव्हती. दोघांनीही एकमेकाकडे बघून बघून घेण्याची भाषा केल्याने वाद चिघळला होता. याची ठिणगी उडाली होती. कोण कुणाचा गेम करतो हे बघतोच अशी चिथावणीखोर भाषा दोघांच्या तोंडून निघाली. राजकारण शिगेला पोहोचले होते. निवडणूक संपली तरी वैरवाद वाढला होता.

हा वाद मिटविण्यासाठी शनिवार दि.२३ जानेवारी रोजी रात्री ९ वाजणेच्या दरम्यान संदीप याला शहारूख आणि कुमार कांबळे यांनी मुजावरकीच्या पट्टीत भांडणे मिटवायची आहेत असे सांगून बोलावून घेतले. दुपारी झालेल्या वादावादीत संदीप याला कुमार कांबळे आणि शहारूख यांनी बघून घेण्याची भाषा केली होती. तरीही तो त्याच्या धमकीकडे दुर्लक्ष करीत तेथे एकटाच गेला होता. त्यावेळी तेथे कुमार कांबळे आणि शाहरूख याच्या बाजूंनी १५ ते २० जण आलेले होते. संदीप हा तेथे एकटाच गेला होता. त्यावेळी परत तेथे राजकीय वर्चस्व वाद उफाळून आला. एकमेकांना शिवीगाळ करण्यात येत होती. त्यातच शहारुख आणि लोकांनी संदीप याला लाथाबुक्कांनी मारहाण करायला सुरूवात केली. ते १५ ते २०जण तर संदीप हा एकटाच होता. सगळे त्याला मारहाण करीत असताना त्यातील एकाने संदीपवर आपल्याकडील चाकू काढून वार केला संदीपने तो वार चुकवून हातावर घेतला हे बघून रोहन कुरणे याने कोयत्याने संदीपच्या डोक्यात वार केला.तर शहारूख मोठा आणि शाहरूख अतार यांनी तलवारीने त्याच्यावर वार करीत त्याला रक्तबंबाळ केले होते.हा वार त्यांनी इतका जोरदारपणे केला होता की त्याच्यावर तलवारीने वार केल्यावर त्या तलवारीची मुठ तुटून वाकली होती.तरीही बाकीचे त्याला मारहाण करीत होते.तेवढयातून ही संदीप हा आपला जीव वाचविण्यासाठी उठून पळून जावू लागला होता.तो डेक्कन रोड कडील रस्त्याने पळून जात असताना मारेकऱ्यांनी त्याला आझाद नगर येथील मोकळ्या मैदानात गाठले आणि त्याचवेळी कुमार कांबळे याने त्याला खाली पाडले व लाथा बुक्कांनी मारहाण करीत मर साल्या असे म्हणत त्याच्या डोक्यावर जवळच पडलेला दगड उचलला आणि घातला. त्यासरशी तो जागेवरच तडफडत होता. त्याच्या तोंडावर मानेवर, आणि शरीरावर ही कोयत्याने आणि तलवारीने वार केल्याने तो घायाळ झालेला होता. मारेकऱ्यांनी त्याच्या शरीराची अक्षरश: चाळण केली होती. ही घटना समजताच कुणाल कांबळे आणि त्यांचे समर्थकही घटनास्थळी दाखल झाले होते. तोपर्यत मारेकऱ्यांनी आपल्या कडील चाकु, कोयता, तलवारी घटनास्थळावरच टाकून पळून गेले होते. रात्रीच्या अंधारात तेथे मोठी धुमश्चक्री उडाली होती. त्याला मारा सोडू नका असे म्हणत रागाच्या भरात संदीपवर वार करण्यात येत होते. घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात संदीप मागाडे हा पडला होता.त्याच्या चेहऱ्यावर मानेवर मोठया जखमा होऊन रक्तस्त्राव झालेला होता. कुणाल कांबळे आणि त्याच्या समर्थकांनी जखमी संदीप याला एका खाजगी वाहनातून इचलकरंजी येथील आयजीएम रुग्णालयात आणले. तेथील डॉक्टरांनी त्याला तपासून त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे त्यांना सांगितले. त्यावेळी आयजीएम रुग्णालयात कार्यकत्यांनी मोठी गर्दी केली होती. या घटनेने कबनूर गावात आणि परिसरात कमालीचे वातावरण तंग बनले होते.जमाव प्रक्षुब्ध बनत चालला होता. कुणाच्या ही अध्यात मध्यात नसणाऱ्या संदीप मागाडे याचा या निवडणूकीच्या राडयातून हाकनाक बळी गेला.

ही घटना शिवाजीनगर पोलीसांना समजताच पोलीस निरी.श्रीकांत पिंगळे हे आपल्या सहकार्यासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. घटनास्थळी रक्ताचे थारोळे, दगड वीट पडलेले चप्पला,एक, दोन मोटार सायकली होत्या.घटनास्थळी पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड, उपाधिक्षक बाबुराव महामुनी यांनी भेट देऊन घटनेची माहिती घेऊन पाहणी केली.आणि पोलीस तपास पथकाला तपासाच्या दृष्टीकोनातून सुचना दिल्या.कबनुर परिसरात या घटनेने वातावरण तंग बनले होते.संदीप मागाडे याच्यावर खूनी हल्ला झाल्याने जोपर्यत मारेकऱ्याना ताब्यात घेत नाही आणि त्यांना फासावर लटकवत नाही तोपर्यत संदीप याचा मृतदेह ताब्यात घेतला जाणार नाही अशी भुमिका मयत संदीप याच्या नातेवाईकांनी पवित्रा घेतला होता. पोलीसांनी घटनास्थळचा पंचनामा करून घटनास्थळावरून तलवार, कोयता आणि मोटार सायकली जप्त केल्या होत्या. पो.निरी. श्रीकांत पिगंळे यांनी आपल्या मार्गदर्शनाखाली या घटनेचा तपास चालू केला.ही घटना कोणत्या कारणातून घडलेली आहे याची कल्पना पोलीसांना आली असल्याने त्या अनुंषगाने त्यांनी तपास चालविला होता.घटनेनंतर काही तासात पोलीसांनी या घटनेतील पाच संशयीताना ताब्यात घेतले या घटनेत कमीत कमी २० जणांचा सहभाग असल्याची माहिती पुढे आल्याने पोलीसांनी इतर फरार आरोपीचा शोध घेण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले कारण मयत संदीपच्या अंत्यसंस्कारावेळी मोठया संख्येने जमाव जमलेला होता.त्यातून वातावरण चिघळण्याची चिन्हे दिसून येत होते. म्हणून पोलीसांनी दक्षता म्हणून गावात चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. राजकीय वैमन्स्य कमालीचे वाढले होते. विनाकारण संदीप सारख्याचा यात बळी गेलेला होता. या घटनेची फिर्याद मयत संदीप यांचा आतेभाऊ कुणाल भिकाजी कांबळे रा.सिध्दार्थ नगर याने शिवाजीनगर पोलीसात दिली होती.त्यावेळी त्याने संशयीत आरोपीची नावे ही आपल्या फिर्यादीत नूमद केली असल्याने पोलीसांनी या घटनेतील संशयीत आरोपी मुदसस्र घुणके, शहारूख शेख, रोहन कुरणे, शहारूख अतार व राहूल शिंदे यांना अटक करून ताब्यात घेतले होते.पोलीसांनी त्याच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना त्यांनी पोलीसांना आपल्या इतर सहकाऱ्यांची नावे सांगितली.या घटनेतील मुख्य संशयीत आरोपी कुणाल कांबळे सह इतर जण फरार होते पोलीस त्याचा शोध घेत होते.

कुमार कांबळे याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी ताब्यात घेतलेल्या मुदस्सर घुणके, शाहरूख शेख, रोहन कुरणे, शहारूख अत्तार, कुमार कांबळे, रवी कांबळे, असिफ खताळ, राहूल शिंदे, आकाश कांबळे, संकेत कांबळे, मोहसिन सनदी,राकेश कांबळे, ऋषीकेश वडर व अन्य त्याच्या साथीदारांच्या विरोधात गु,रजि.नं. ४१/२०२१ भा. दं. वी. कलम ३०२, १४३, १४७, १४८, १४९,५०४,५०६,आर मॅट ४/२५ प्रमाणे गुन्हा नोंद करून यातील मुदसस्र घुणके, शाहरूख शेख, रोहन कुरणे शाहरूख आतार, राहूल शिंदे याना सोमवार दि.२५ जानेवारी रोजी इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायालयात उभे केले असता. मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेतील फरारी संशयीत आरोपीच्या शोधासाठी पोलीसांची वेगवेगळी पथके रवाना करण्यात आली होती. घटनाशब्द होईपर्यत त्याचा शोध सुरू होता. या घटनेचा पुढील तपास पो.नि. पिंगळे यांच्या मार्गदर्शनखाली चालू आहे. त्यांना पो.हवा. कोठीवाले हे मदत करीत आहेत.

सुडामुळे भाचीने दिला नात्याला फाटा...

या भांडणात सावित्रीबिनी अश्विनीला मारहाण केली होती आणि त्यानंतर अश्विनी आणि तिचा प्रियकर गायब झाला होता याच दरम्यान एका छोट्या मुलीकडून झरश्रशर्ट घातलेला माणूस आला होता एवढी म, अहिती मिळाली या माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा शोध सिउरू केला मिरपूर, तळेगाव, लोहारे, मेध्वन आदी परिसर पिंजून काढला यावेळी आरोपी जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यातील एका गावात लपला असल्याची पोलिसांना माहिती मिळताच त्यांनी सापळा लावला आणि त्या ठिकाणी छापा टाकून अश्विनी व तिचा प्रियकर भाऊसाहेब उर्फ भावड्या याला अटक केली चौकशीत त्यांनी गुन्हा काबुल करून पोलिसांचा तपास भात्काव्ण्यासाठीच आपण सवित्रिबयीच्य अंगावरचे दागिने कडून घेतले व तिची चोरीच्या उद्देशानेच हत्या झाली असावी असे भासवले असे भाव्द्याने सांगितले तर आत्येने शिवीगाळ करून मारहाण केल्याने आपण भाव्द्याच्या हातून तिचा कट काढल्याचे अश्विनी हिने काबुल केल्यानंतर दोगांवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली.

खुनाचे रहस्य अजून नाही कळले...

(वय ५५ रा. विजापूर नाका, एक नंबर झोपडपट्टी, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. सागर सिद्राम सावगे (वय २२ रा. विजापूर नाका, एक नंबर झोपडपट्टी, सोलापूर) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. सागर याचा २४ जानेवारी दुपारी एक ते २५ जानेवारी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास, दरम्यान अक्कलकोट तालुक्यातील हालहळ्ळी (अ) येथे खून झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. या घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.संतोष गायकवाड यांनी भेट देऊन पाहणी केली आहे. अज्ञात आरोपीविरुद्ध अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून याचा अधिक तपास उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कल्लप्पा पुजारी करीत आहेत.

मित्राच्या पत्नीशी अनैतिक संबंध ...

संबंधात अडथला ठरणाऱ्या एका मित्रानेच त्याच्या मित्राची हत्या करू मृतदेह विहिरीत फेकला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मित्राला आणि मयात इसमाच्या पत्नीला अटक केली आहे. विवाहबाह्य संबंधात अडथळा ठरणाऱ्या मित्राची हत्या केल्याचा प्रकारा भंडारा जिल्ह्यात उघडकीस आला आहे. आरोपीचे मयत तरुणाच्या पत्नीशी प्रेमसंबंध होते. त्यामुळे मार्गातील काटा काढण्यासाठी मित्रानेच मित्राची रुमालाने गळा आवळून हत्या केली. विवाहबाह्य प्रेम प्रकरणातून मित्रानेच जीव घेतल्याची घटना भंडारा जिल्ह्याच्या मोहाडी तालुक्यातील हिवरा भागात घडली आहे. आरोपी राकेश मतारे याचे २६ वर्षीय मित्र अमोल चवलेच्या पत्नीशी प्रेमसंबंध होते. मात्र अफेअरमध्ये अडसर ठरणाऱ्या अमोलची राकेशने निर्घृण हत्या केली. रुमालाने गळा आवळून राकेशने अमोलची हत्या केली. त्यानंतर त्याचा मृतदेह एका विहिरीत फेकून दिला होता. अमोल मृतावस्थेत आढळल्यानंतर एकच खळबळ उडाली. हत्येप्रकरणी आरोपी मित्र राकेश मतारे याला आंधळगाव पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याविरुद्ध कलम ३०२, २०१ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

एकाच आठवड्यात विवाहबाह्य संबंधातून मृत्यू होण्याच्या दोन घटना भंडाऱ्यात समोर आल्या आहेत. विवाहित प्रेयसीला भेटण्यासाठी गेला असताना अचानक पती आल्यामुळे गडबड उडून घरातून पळताना पडून प्रियकाराचा मृत्यू झाल्याचा प्रकार बुधवारीच घडला होता. महेश वसंत डोंगरवार हा तरुण विवाहित प्रेयसीला भेटायला गेला होता. भंडारा शहरालगतच्या गणेशपूर येथील मेहर अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या प्रेयसीची भेट घेण्यासाठी महेश मध्यरात्री गेला होता. महेश आणि संबंधित विवाहिता बेडरुममध्ये असताना अचानक दार वाजलं आणि दोघांची भंबेरी उडाली.

विवाहित प्रेयसीच्या पतीची अचानक एंट्री झाल्यामुळे एकच गोंधळ उडाला. महेश तातडीने बेडरुममधून बाल्कनीत पळाला. दरवाजा लावत खाली उतरण्याची त्याने घाई केली. या गडबडीत महेशचा पाय घसरला आणि तो थेट सिमेंटच्या रस्त्यावर पडला. अपार्टमेंटच्या बाल्कनीतून खाली थेट रस्त्यावर पडल्यामुळे महेशला जबर मार बसला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. विवाहित प्रेयसीने दिलेल्या तक्रारीवरुन भंडारा शहर पोलिसात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेमुळे सर्वत्र चर्चेला तोंड फुटलं आहे.

पान ८ वरून....

पालघरमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात...

जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी २६,००० स्ट्रोबेरीच्या रोपांची प्रायोगिक तत्त्वावर लागवड केली असून प्रती दिन २५० किलो स्ट्रोबेरीचे उत्पादन मिळत आहे. याची बाजारपेठेत प्रती किलो २०० रु. प्रमाणे विक्री करण्यात येत आहे. जिल्ह्यात जवळपास ५५० हेक्टर क्षेत्रावर मोगरा लागवड झाली आहे. यापासून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक हातभार लागत आहे. मोगरा लागवड केलेल्या शेतकऱ्यांचे गट करून जव्हार येथे वृंदावन पुष्प उत्पादक शेतकरी कंपनी स्थापन करण्यात आली असून सर्व शेतकऱ्यांची फुले दादर-मुंबई बाजारपेठेत सकाळी लवकर पोहचत आहेत. शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारावी याकरिता पिक पद्धतीत बदल करण्यावर भर देण्यात आला आहे. या माध्यमातून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ७२८१ लाभधारकांनी विविध फळपिकांची ३५५८.०७ हेक्टर वर लागवड करून राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. या मध्ये प्रामुख्याने काजूच्या जवळ पास २ लाख कलमांची लागवड करण्यात आली आहे. एक जिल्हा एक उत्पादन योजनेअंतर्गत चिकू पिकाची राज्यस्तरावरून निवड करण्यात आली असल्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी सांगितले.

जिल्ह्यामध्ये महाआवास अभियान राबवण्यात येत आहे या अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेत २५७५९ लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी २११९५ घरे आज अखेर पूर्ण झालेली आहेत. याच बरोबर राज्य पुरस्कृत रमाई, शबरी आणि आदिम योजनेंतर्गत ६१०६ लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करण्यात आली असून यापैकी ४००६ घरकुले पूर्ण झालेली आहेत. या अभियानांतर्गत जिल्ह्याचे शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. जल जीवन मिशन योजने अंतर्गत सन २०२०-२१ मध्ये ६८,८४३ कुटुंबांना वैयक्तिक स्वरूपात नळाने पाणीपुरवठा पुरविण्यासाठी कनेक्शन पुरविण्यात आले आहेत. जिल्ह्यामध्ये कातकरी उत्थान अभियानंतर्गत खाजगी जागेवरील ३१८८ घरांचे, बन विभागाच्या जागेवरील ८२० घरांचे, शासकीय जागेवरील ३९३ घरांचे, आणि गावठाण जागेवरील २७५५ घरांचे अतिक्रमण नियमानाकूल करून आदिवासीच्या नावे करून दिली आहेत. जिल्हा वनहक्क समिती कक्ष स्थापन करून वनहक्क दावे मंजूरीचे कामे मोठ्या प्रमाणात चालू आहेत. जिल्ह्यात वनहक्क कायदयांतर्गत आजअखेर ४४५२२ वैयक्तिक वनहक्क दावे मंजूर करण्यात आले असून त्याचे क्षेत्र ५०३८५ एकर इतके आहे. मागिल ४ महिन्यात ४२२९ वैयक्तिक वनहक्क दावे मंजूर करून, आदिवासींना हक्क देण्यात आले आहेत. तसेच ४३७ सामुहिक वनहक्क दावे मंजूर असून त्याचे क्षेत्र ५५ हजार ४१ एकर इतके आहे. रोजंदारीवर काम करणाऱ्या मजूरांना पौष्टीक अन्न माफक दरात मिळावे यासाठी शिवभोजन हि योजना चालू करण्यात आली होती या योजनेला आज एक वर्ष पूर्ण होत आहे. या वर्षभरात ४,५३,११९ (चार लाख त्रेपन्न हजार एकशे एकोणीस) थाळ्यांचे वाटप करण्यात आले आहे. शिवभोजन केंद्रामधून प्रति दिन २८५० थाळ्यांचे वाटप करण्यात आले असल्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी सांगितले. क्यार व महा चक्रीवादळामुळे झालेल्या अवेळी पावसामुळे शेतीपिकांच्या नुकसानीपोटी आपद्ग्रस्तांना विशेष दराने मदत देण्यासाठी ४२,७४,७८०००/ - (अक्षरी बेचाळीस कोटी चौऱ्याहत्तर लाख अठ्याहत्तर हजार रुपये) इतके अनुदान शासनामार्फत वाटप करण्यात आलेले आहे. जुन ते ऑक्टोबर २०२० मध्ये अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे शेतपिकांच्या नुकसानीपोटी आपद्ग्रस्तांना विशेष दराने मदत देण्यासाठी रक्कम रुपये २५,५८,५२,०००/-(पंचवीस कोटी अठ्ठावण्ण लाख बावन्न हजार रुपये) अनुदान वाटप करण्यात आले. जिल्ह्यात मजुरांना गावातच रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी ९,५५०(नऊ हजार पाचशे पन्नास) एवढ्या मोठ्या प्रमाणावर कामे उपलब्ध करुन दिली आहेत. जिल्ह्यासाठी कोव्हिशिल्ड १९,५०० (एकोणीस हजार पाचशे) लस प्राप्त झाली असून १७,४११ (सतरा हजार चारशे अकरा) व्यक्तींना लस देऊन उद्दिष्ठ गाठायचे आहे. यात पहिल्या टप्प्यात आरोग्य कर्मचारी यांना ही लस देण्यात आली आहे. मा. मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या संकल्पनेतून साकार झालेले माझे कुटुंब माझी जबाबदारी या अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यात जनजागृती करुन कोव्हिड रुग्णाच्या संख्येत नियत्रंण आणण्यात आले आहे. त्यामुळे कोव्हिड रुग्ण बरे होण्यामध्ये पालघर जिल्हा आघाडीवर आहे. जिल्ह्यात एकुण ४५००० (पंचेचाळीस हजार) कोव्हिड रुग्ण आढळून आले होते. यापैकी ९७ टक्के रुग्ण बरे झाले असल्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी सांगितले.

01 TO 07 FEB 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 30/01/2021 9:40 PM Page 1

टेंभुरखेडा येथे ग्रामीण भागातल्या समस्या सोडवण्यासाठी 'आमदार आपल्या दारी'

आमदार देवेंद्र भुयार यांनी सर्व विभागाचे अधिकारी गावात नेऊन सोडवल्या नागरिकांच्या समस्या!

वरुड/प्रतिनिधी

मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे तरुण तडफदार आमदार देवेंद्र भुयार कायमच जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे पाहायला मिळाले व आजही शहरी असो अथवा ग्रामीण प्रत्येक नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आमदार देवेंद्र भुयार हे कायमच जनतेत पाहायला मिळतात. मागील वर्षी झालेल्या अवकाळी पावसामुळे व गारपिटीमुळे मोर्शी मतदारसंघातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते त्यावेळी देखील क्षणाचाही विलंब न करता आमदार देवेंद्र भुयार यांनी थेट बांधावर जाऊन अधिकाऱ्यांना तात्काळ पंचनामा करण्याच्या सूचना केल्या होत्या. त्याचा परिणाम असा झाला की अवघ्या काही महिन्यातच आमदार देवेंद्र भुयार यांनी उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून विशेष बाब म्हणून वरूड मोर्शी तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांना कोट्यावधी रुपये मदत मिळवून दिली त्यामुळे वरुड मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला.

त्यानंतर आता ग्रामीण भागातील अडचणी सोडवण्यासाठी आमदार आपल्या दारी हे अभियान राबवण्यात येत असून या अभियाना अंतर्गत आमदार आमदार देवेंद्र भुयार स्वतः ग्रामीण भागात जाऊन तेथील जनतेच्या समस्या जाणून घेत आहेत व त्या सर्व समस्या जागेवरच कशा सोडवता येतील त्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देखील निर्गमित करत आहेत. या अभियानामुळे ग्रामीण भागातील हजारो नागरिकांच्या समस्या या काही मिनिटातच सुटत असल्याने ग्रामीम भागातील नागरिक देखील आता आनंद व्यक्त करताना पाहायला मिळत आहे. गेल्या अनेक वर्षात ज्या समस्या सुटल्या नाहीत त्या समस्या आता काही मिनिटातच सुटत

असल्याने गावकरी देखील आता म्हणू लागले आहेत होय हा आमचा गोर गरीब जनतेचा आमदार आहे.' यावेळी मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार ,तहसीलदार किशोर गावंडे, नायब तहसीलदार प्रतिभा चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष बाळू कोहळे पाटील, जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र बहुरूपी, गट विकास अधिकारी वासुदेव कनाटे, रमेश देशमुख, एकनाथ देशमुख, शयमराव गावंडे, ऋषिकेश राऊत, संदीप खडसे, भगवंत वानखडे, बिट्टू देशमुख, सचिन वानखडे, कैलास देशमुख, यांच्यासह शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी, पदाधिकारी उपस्थित होते.

शहरात बसून नव्हे तर गावा गावात जाऊन तेथील ग्रामस्थांच्या समस्या जाणून घ्यायच्या व त्या सर्व समस्या जागेवरच कशा सुटतील यासाठी तात्काळ अधिकाऱ्यांना सूचना द्यायच्या ही नवीन पद्धत सध्या मोर्शी विधानसभा मतदारसंघात पाहायला मिळते. मायबाप जनतेला आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी वारंवार चकरा मारायची वेळ येऊ नये यासाठी आमदार देवेंद्र भुयार यांनी आमदार आपल्या दारी या अभियानांतर्गत जिल्हा परिषद गट व गण निहाय दौरे सध्या सुरू केले आहेत. आमदार देवेंद्र भुयार यांच्या संकल्पनेतून आमदार आपल्या दारी उपक्रम वरुड तालुक्यातील विविध गावांत राबविण्यात येत आहे. मोर्शी विधानसभा मतदार संघामध्ये हा उपक्रम राबविण्यात येत असून, वरुड तालुक्यात टेंभुरखेडा येथे आयोजित आमदार आपल्या दारी उपक्रमाचा टेंभुरखेडा, तिवासाघाट, गव्हांणकुंड, इसंबरी, बहादा, भेमडी, झटामझिरी, पिंपळशेंडा, गव्हानकुंड, इसंबरी, बहादा, येथील ग्रामस्थांनी लाभ घेतला.

या उपक्रमाच्या माध्यमातून गावातील नागरिकांच्या महावितरण, ग्राम विकास व महसूल विभागाचे संबंधित असलेल्या सर्व अडचणी कशा सोडवता येतील यासाठी आमदार स्वतः सरसावले असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने ग्रामीण भागातील वृद्ध नागरिकांच्या संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेच्या अडचणी मागील अनेक वर्षापासून प्रलंबित होत्या. या सर्व अडचणी आता काही क्षणातच मार्गी लागत आहेत आणि यामुळे निराधारांना दिलासा मिळत आहे. जनतेला केंद्रबिंदू म्हणून आमदार देवेंद्र भुयार यांनी हिची नवीन मोहीम हाती घेतली आहे त्या मोहिमेमुळे आता अनेक वर्षापासून रखडलेले प्रश्न तात्काळ मार्गी लागत आहेत. लवकरच मोर्शी विधानसभा मतदारसंघातील जिल्हा परिषद गट आणि गण निहाय सर्व गावांना आमदार स्वतः भेटी देऊन त्यांचे प्रश्न गावात बसूनच मार्गी लावणार असून आता छोट्या छोट्या कामांसाठी वृद्ध नागरिकांना शहरात येण्याची आवश्यकता भासणार नाही. आणि हेच या मोहिमे मागची भावना असल्याचे आमदार देवेंद्र भुयार यांनी सांगितले. श्रावणबाळ, संजय गांधी निराधार योजना, महसूल विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, कृषी, महिला व बालकल्याण विभाग, भूमी अभिलेख विभाग, आरोग्य विभाग, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, समाजकल्याण, सिंचन, लघु पाटबंधारे, महावितरण, पुरवठा, पशुसंवर्धन, आरोग्य, कामगार कल्याण, परिवहन विभाग आदी विविध विभागांच्या दालनातून नागरिकांना योजनांची माहिती देण्यात आली व त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले. आमदार आपल्या दारी उपक्रमाच्या ठिकाणी नागरिकांना त्यांचा अर्ज दाखल करण्यासाठी लेखन कक्ष, अर्जवाटप कक्षाची सुविधा यासह छायाचित्र, झेरॉक्स आदी सुविधाही उपलब्ध करून देण्यात आल्या. दिव्यांग नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक, युवती आदी शेकडो नागरिकांनी उपक्रमाचा लाभ घेतला. आधारकार्ड, जेष्ठ नागरिक स्मार्ट कार्ड, पोखरा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना, यासह विविध विभागाचे अर्ज स्वीकारण्यासाठी स्वतंत्र कक्ष उपलब्ध करून देण्यात आले होते.

सोलापूर जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांच्या हस्ते बोरामणी पोलीस दुरक्षेत्र इमारतीचे उद्घाटन!

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील सोलापूर तालुका पोलीस स्टेशन अंकित असलेल्या बोरामणी दुरक्षेत्र इमारतीचे बांधकाम (पोलीस चौकी) उदघाटन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या हस्ते व पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण तेजस्वी सातपुते यांच्या उपस्थितीत पार पडली आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या विशेष पेट्रोलिंग मोटारसायकलीचे अनावरणही यावेळी करण्यात आले आहे. मंगळवारी सायंकाळी या कार्यक्रमासाठी ग्रामीण पोलीस मुख्यालय येथून जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, महापालिका उपायुक्त धनराज पांडे आदी वरिष्ठ अधिकारी सोळा किलोमीटर अंतर पार करून सायकलवरून बोरामणी येथे दाखल झाले. सध्या चालू असलेल्या रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त जिल्हाधिकारी शंभरकर यांनी वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन केले. सामान्य जनतेमध्ये पोलिसांबद्दल विश्वास निर्माण व्हावा तर गुन्हेगारांवर वचक बसावा, यासाठी पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. या कार्यक्रमास राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी संजय कदम, पोलीस उपअधीक्षक सूर्यकांत पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रभाकर शिंदे, किशोर रकताटे, नितीन चप्पळगावकर, संजयकुमार सिंग, सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप व तालुका पोलीस ठाण्याचे सर्व अधिकारी व पोलीस कर्मचारी आदी उपस्थित होते, सूत्रसंचालन प्रा.साळुंखे यांनी केले आहे.

महात्मा गांधीजींच्या ७३ वीं पुण्यतिथी निमित्त महात्मा गांधी उद्यानात 'भावांजली' कार्यक्रम!

जळगाव/प्रतिनिधी

गांधी रिसर्च फाउण्डेशन गांधी तीर्थच्यावतीने महात्मा गांधीजींच्या ७३ व्या पुण्यतिथी निमित्त दि. ३० जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता महात्मा गांधी उद्यानात भावांजलि कार्यक्रम आयोजण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्याहस्ते होत आहे. यात प्रामुख्याने महात्मा गांधीजींच्या अंतिम यात्रेच्या ऐतिहासिक घटनेवर आधारीत अधिकृत संदर्भ असलेले गांधी रिसर्च फाउंडेशनचे विशेष चित्र प्रदर्शन जे ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्याना नागरिकांना विनामूल्य पाहता येईल. तसेच दि. ३० रोजी सायंकाळी साडेसहा ते रात्री नऊ दरम्यान् गांधीजींची अंतिम झलक आणि विश्वातील प्रसिद्ध व्यक्तींनी महात्माजींना दिलेली श्रद्धांजली अशी हिंदी व इंग्रजीची द लास्ट जर्नी' डॉक्युमेंटरीचे सहा शो

गांधी रिसर्च फाउंडेशनतर्फे चित्रप्रदर्शन आणि डॉक्युमेंटरी



देखील दाखविले जाणार आहेत. बदलत्या जीवनशैली व सध्याच्या काळात देखील महात्मा गांधीजी यांचे विचार शाश्वत आहेत. संकटाची परिस्थिती सुरु आहे. मात्र हताश, निराश न होता नैतिक मुल्ये जपत सामाजिक दायित्वाची जबाबदारी घेवून पुढे पुढे मार्गक्रमण करणे म्हणजे गांधीजी यांच्या विचारांवर मार्गक्रम करणे होय. हा प्रयत्न भवरलालजी जैन यांनी केला आहे. तोच प्रयत्न जैन परिवार देखील करत आहे. पुढच्या पिढीपर्यंत गांधी विचार पोहोचावे यासाठी गांधी तीर्थची निर्मिती केली आहे. गांधी रिसर्च फाउंडेशनतर्फे विविध उपक्रम चालविले जातात. महात्मा गांधी जयंती आणि त्यांचा स्मृतिदिन विशेषत्वाने साजरा केला जातो. ३० जानेवारी २०२१ रोजी महात्मा गांधीजींच्या ७३ व्या स्मृतिदिनी त्यांना भावांजली कार्यक्रमाच्या माध्यमातून आगळी वेगळी श्रद्धांजली दिली जात आहे. लॉकडाऊन नंतरचा हा पहिलाच सार्वजनिक कार्यक्रम होत आहे. त्यामुळे कार्यक्रमास येणाऱ्या सर्वांनी तोंडावर मास्क लावणे आणि सोशल डिस्टेंसिंग राखणे अनिवार्य आहे. या कार्यक्रमास कार्यक्रमास अवश्य उपस्थित रहावे असे आवाहन गांधी रिसर्च फाउंडेशनतर्फे केले आहे.

उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा

देवणी/प्रतिनिधी

राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत परमेश्वरी मंगल कार्यालय नळेगाव रोड येथे कृषी उत्पन्न बाजार समिती उदगीरची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न संपन्न झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिद्धेश्वर गुणवंतराव पाटील सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती हे होते, तर प्रमुख अतिथी लक्ष्मीताई चंद्रशेखर भोसले, उपसभापती रामराव व्यंकटराव बिरादार, वीरशैव समाज संघटनेचे अध्यक्ष चंदर अण्णा वैजापूरे काँग्रेस युवा नेते विजय निटुरे, तालुका खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष भरत चामले, चंद्रशेखर भोसले प्रतिष्ठान अध्यक्षा प्रीती भोसले तसेच उदगीर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कल्याण पाटील व त्यांचे सर्व पदाधिकारी, बाजर समितीचे संचालक पद्माकर उगीले, संजय पवार, गजानन बिरादार, शिरीष पाटील, रमेश पाटील, धनाजी जाधव, सुभाष धनुरे, कैलास पाटील, गौतम पिंपरे, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष संभाजी घोगरे व सर्व सदस्य, तसेच गुंमस्ता संघाचे अध्यक्ष विनायक चाकुरे व सदस्य व हमाल संघटनेचे अध्यक्ष भालेराव व सदस्य सर्व मापाडी तसेच तालुक्यातील नवनिर्वाचीत सदस्य उपस्थित होते.

राजमाता जिजामाता शैक्षणिक संस्थेने १२० विद्यार्थी घेतले दत्तक

लातूर/प्रतिनिधी

दहावीच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी, निकाल उंचावा यासाठी राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थांतर्गत नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी जिद्द व परिश्रमाच्या माध्यमातून यशाचे शिखर गाठावे, असे आवाहन प्राचार्य केंद्रे यांनी शाळेचे घंटा वाजल्यानंतर विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देवून केले. दरम्यान, या संस्थेतील शिक्षकांनी शिक्षणासाठी १२० विद्यार्थी दत्तक घेतले आहेत. या विद्यार्थ्यांच्या घरी जावून तज्ज्ञ शिक्षक त्यांच्या शंकांचे निरसन करून पालक व विद्यार्थ्यांशी संवाद साधत विद्यार्थ्यांचे मनोधैर्य वाढवत असून या उपक्रमाचे स्वागत करण्यात येत आहे.

कोरोना महामारीमुळे गेल्या सुमारे आठ-नऊ महिने शाळा बंद होत्या. बुधवारी पुन्हा शाळा सुरु करण्यात आल्या. दरम्यान, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलांतर्गत सर्व विद्यालयांच्या शाळांतील शिक्षकांसह विद्यार्थी व पालकांची संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी बैठक घेतली. प्राचार्य केंद्रे यांच्या मार्गदर्शनामुळे प्रत्येक शिक्षकाने दहा या प्रमाणे १२० विद्यार्थी शिक्षणासाठी दत्तक घेतले. या नूसार शिक्षक विद्यार्थ्यांच्या घरी भेट देवून पालक व विद्यार्थ्यांशी संवाद साधत आहेत. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करीत

आहेत. संकुलाशिवाय अन्य शिक्षकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यात येत आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांच्या तीन परीक्षा घेण्यात येणार आहेत. तिसरी परीक्षा बोर्ड पॅटर्नप्रमाणे बारकोड पद्धतीने घेण्यात येणार आहे.

या प्रसंगी प्राचार्य डी.एन.केंद्रे म्हणाले, लॉकडाऊनमुळे विद्यार्थ्यांमध्ये चिडचिडेपणा निर्माण झाल्याच्या तक्रारी येत आहेत. हा चिडचिडेपणा दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधणे गरजेचे आहे. संवादातूनच कोणत्याही समस्या मार्गी लागतात. त्यामुळे आमचे शिक्षक विद्यार्थ्यांच्या घरी जावून विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन करीत आहेत. दहावीची परीक्षा २९ एप्रिलपासून आहे. जिद्द व परिश्रमातून हमखास यश मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अंग झटकून अभ्यासाला लागावे, असे आवाहन करून कोरोना काळात शिक्षकांनी केलेले ज्ञानदानाचे कार्य कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गारही प्राचार्य केंद्रे यांनी काढले. वरील उपक्रमासाठी प्राचार्य संगमेश्र्वर केंद्रे, पर्यवेक्षक रमेश बिरादार, अशोक पवार, मदन धुमाळ, शोभा कांबळे, सुनीता जवळे, अनुराधा पाटील, संजय गुरमे, अशोक मुंढे, महेश मोटाडे, पांडुरंग कुलकर्णी, सत्यवान देशपांडे, सुधाकर लोहकरे, विवेकानंद लोहकरे आदी परिश्रम घेत आहेत.

दोन कुख्यात घरफोडी करणाऱ्यांना तुळींज पोलिसांकडून अटक

नालासोपारा/प्रतिनिधी

तुळींज पोलिसांनी दोन कुख्यात घरफोडी करणाऱ्या चोरांना अटक केली असून त्यातील एकावर २७ तर दुसऱ्यावर घरफोडीच्या चार गुन्ह्यांची नोंद आहे. वसई तालुक्यातील तुळींज पोलीस ठाण्याच्या हद्दीत १३/१/२०२१ च्या रात्री फॅशन ॲडीक्षण या कपड्याच्या दुकानाचे शटरचे लॉक तोडून दुकानातील १७३००० रुपये किमतीचे कपडे चोरीला गेले होते. या प्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात ७७/२०११ भादंवीस कलम ४५७,३८० प्रमाणे गुन्हा दाखल होता. पोलिसांनी या गुन्ह्याचा कौशल्य पूर्ण तपास करून अब्दुल अनिस नूर मोहम्मद

शेख बांद्रा आणि अस्या नदीम खान राजीव नगर बांद्रा यांना १९/१/२०२१ रोजी अटक केली. या आरोपीकडून तुळींज पोलीस ठाण्याच्या हदीतिल ९ गुन्ह्यांची उकल करून २१९,८८६रुपये किमतीचा मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेली रिक्षा जप्त करण्यात आली. यातील आरोपी क्रमांक १ वर मुंबई परिसरात २७ घरफोडीच्या गुन्ह्यांची नोंद आहे, तर आरोपी क्रमांक २ वर ४ घरफोडीच्या गुन्ह्याची नोंद आहे. सदर कामगिरी परिमंडळ ३ चे पो.उपयुक्त प्रशांत वाघुंडे सह. पो.आयुक्त अमोल मांडवे तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पो. निरीक्षक राजेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि.संदेश पलांडे, पो.उ.नि. ज्ञानेश्वर कोकाटे बाळू बांदल,शिवानंद सुत्नसे, पो.हवा. अनिल शिंदे, सावदेकर, आनंद मोरे शेखर पवार, राकेश शिरसाट, दीपक देसले, योगेश नगरे, अश्फाक शेख गडाख पोते, रूट, छाप्रीबन होमगार्ड खेडकर यांच्या पथकाने पार पडली.

जाहीर लिलाव

तमाम जनतेस कळविण्यात येते की, कौटुंबिक न्यायालय, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स बांद्रा पुर्व यांचे आदेशानुसार व मा. जिल्हाधिकारी पालघर यांचेमार्फत प्राप्त महसूल वसुली प्रमाणपत्रानुसार श्री. मोहम्मद शकील अख्तर रा. फ्लॅट नं. ४०३, चौथा मजला, बिल्डींग नं. ईसी १७३, एव्हरशाईन सिटी अव्हेन्यु, सेक्टर नं. ७ ता. वसई, जि. पालघर यांचेकडून वसुल करावयाच्या रकमेसाठी खालील तपशीलातील जप्त केलेली स्थावर मालमत्ता जशी आहे तशी तपशीलात दर्शविल्याप्रमाणे दिनांक २३/०२/२०२१ रोजी सकाळी /दुपारी १२.०० ते २.०० या सुमारास मौजे माणिकपूर, ता. वसई येथे विषयांकित मिळकतीवर लिलावाद्वारे विक्री करावयाची आहे.

स्थावर मालमत्तेचा तपशील

नाव	भू-मापन क्रमांक व पोट-विभाग क्रमांक	क्षेत्र	आकारणी
१	२	३	४
एव्हरशाईन सिटी, माणिकपूर वसई (पुर्व)	सिटी. स.नं. ४३६/१९ फ्लॅट नं. ४०३, चौथा मजला, बिल्डींग नं. ईसी १७३ एव्हरशाईन जास्मिन को.हौ.सो. एव्हरशाईन सिटी अव्हेन्यु, सेक्टर नं. ७ वसई (पुर्व)	४९.४ चौ.मी.	-

लिलावाच्या अटी व शर्ती :

१) सह दुय्यम निबंधक वसई क्र. यांनी निश्चित केलेली बाजारमुल्याची रक्कम रुपये ३०,२८,२२० ही रक्कम अपसेट किंमत म्हणून निश्चित करण्यात आली आहे.

२) उपरोक्त तक्त्यात नमूद मालमत्तेच्या जाहीर लिलावासाठी र. रू.३०,२८,२२०/- (अक्षरी रुपये तीस लाख अठ्ठावीस हजार दोनशे विस रूपये मात्र) पासून बोलीस सुरूवात होईल व जाहीर लिलावामध्ये भाग घेणाऱ्यांपैकी सर्वात उच्चतम बोली बोलणाऱ्यास सदर लिलाव अंतिम करण्यात येईल.

३) अंतिम लिलाव बोलीच्या २५ टक्के रक्कम त्वरीत भरावी लागेल व उर्वरित रक्कम सात दिवसांचे आत भरावी लागेल. २५ टक्के रक्कम सरकार जमा करतेवेळी आयकर विवरणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

४) स्विकारलेल्या बोलीदाराने संपूर्ण बोलीची रक्कम भरल्यानंतर खरेदीखत करून देण्यात येईल. त्यासाठी मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. अनुषंगाने येणारा खर्च बोली स्विकारलेल्याने करावयाचा आहे व त्यावेळी सरकारची सर्व थकबाकी बोलीदाराने देणेची आहे.

५) मालमत्तेबाबत वा त्या अनुषंगाने काही अतिरिक्त माहिती आवश्यक असल्यास ती कार्यालयीन वेळेत तलाठी सजा माणिकपूर व तहसिलदार कार्यालय वसई येथे संपर्क साधून मिळवीता येईल.

६) मालमत्तेवरील जमीन महसूल, बिनशेती आकार व इतर देणी खरेदीदाराने अदा करावयाची आहेत.

७) लिलावात अंतिम बोली बोलणाऱ्याने लिलाव प्रक्रियेचा सर्व खर्च अदा करणे बंधनकारक आहे.

८) लिलावात अपेक्षित बोली न आल्यास अथवा काही अपरिहार्य कारणास्तव लिलाव रद्द/ तहकूब करण्याचा संपूर्ण अधिकार/ हक्क निम्नस्वाक्षरीदारांचा राहील.

ठिकाण : वसई
दिनांक : २९/०१/२०२१

सही/-
तहसिलदार, वसई

01 TO 07 FEB 2021 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 30/01/2021 9:41 PM Page 1

पालघरमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

जिल्ह्याची विकासाच्या दिशेने वाटचाल -दादाजी भुसे

पालघर/प्रतिनिधी

कृषी, क्रिडा, शिक्षण, आदिवासी विकास अशा क्षेत्रा मधून पालघर जिल्हा विकासाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचा विश्वास कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भूसे यांनी व्यक्त केला. भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७१ व्या वर्धापन दिना निमित्त मूख्य शासकिय ध्वजारोहन पालकमंत्री दादाजी भूसे यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते. गोलंदाजी आणि फलंदाजी मध्ये अष्टपैलू कामगीरी करुन पालघरचे भूमिपुत्र शार्दुल ठाकूर यांनी देशाला विजय प्राप्त करुन दिल्यामुळे शार्दुल ठाकूर यांना पालघर रत्न हा पुरस्कार पालकमंत्री श्री भूसे यांच्या हस्ते देण्यात आला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेवर आधारित माझे कुटुंब माझी जबाबदारी या अभियानाच्या माध्यमातून कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची अंमलबजावणी यावेळी करण्यात आली. नगराध्यक्षा उज्वला काळे, खासदार राजेंद्र गावीत, आमदार श्रीनिवास वनगा, जिल्हाधिकारी डॉ.माणिक गुरसळ, जिल्हापरिषद मुख्यकार्यकारी अधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलिस अधिक्षक दत्तात्रेय शिंदे, विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी, नागरीक, स्वातंत्र्य सैनिक, ज्येष्ठ नागरीक आदि उपस्थित होते.

जिल्ह्यामध्ये विविध कृषी योजनेच्या माध्यमातून शेतकरी बांधवांना फायदा झाला आहे. बिरसा मुंडा कृषी क्रांतीकारी योजना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेमधून जिल्ह्यातील एकुण १०६५ शेतकऱ्यांनी लाभ घेतला आहे. जिल्ह्यातील जव्हार आणि मोखाडा तालुक्यात अति दुर्गम आदिवासी भागातील शेतकरी पारंपारिक भात, नाचणी व वराई ची शेती करतात. आदिवासी शेतकरी स्वतः आधुनिक शेतीकडे वळले आहेत. त्यांनी कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली स्ट्रोबेरी झाडांची लागवड करून आपला आर्थिक स्थर उंचावला आहे. ...पान ६ वर

अजित बेळकोणे यांच्या हस्ते 'क्राईम संध्या डायरी'चे प्रकाशन

देवणी/प्रतिनिधी

'क्राईम संध्या डायरी २०२१चे प्रकाशन काँग्रेसचे नवनियुक्त तालुकाध्यक्ष ॲड अजित बेळकोणे यांच्या हस्ते गुरुवारी सकाळी दहा वाजता मौजे विळेगाव येथील आई जगदंबेच्या मंदीरात करण्यात आले. दरवर्षी क्राईम संध्या डायरीचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येते. त्या परंपरे नुसार यावर्षी हि आयोजन करण्यात आले होते. या प्रकाशन सोहळ्या प्रसंगी देवणी तालुक्यातील पत्रकारांच्या वतीने तालुकाध्यक्ष ॲड अजित बेळकोणे यांचा सत्कार करण्यात आला व उपस्थितांना क्राईम डायरी २०२१ची भेट देण्यात आली.

याप्रसंगी तालुक्यातील पत्रकार प्रताप कोयले, जाकिर बागवान, बालाजी कवठाळे, संतोष पाटील जवळगेकर, प्रा.नरसींग सुर्यवंशी, दिलीप शिंदे, कृष्णा पिंजरे, माधवराव मुर्गे, जानिमियाँ मनियार, सुभाष पाटील, हरीभाऊ माने यांच्या सह विळेगाव येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक पत्रकार लक्ष्मण रणदिवे यांनी तर आभार प्रदर्शन शकिल मनियार यांनी केले.

- साप्ताहिक क्राईम संध्या दैनंदिन डायरी २०२१ चे प्रकाशन जिल्हा पोलीस अधीक्षक निखील पिंगळे यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी क्राईम संध्याचे सहसंपादक राम पाटोळे, माझं लातूर परिवाराचे प्रमुख तथा पत्रकार सतीश तांदळे, जय महाराष्ट्र वृत्तवाहिनीचे सचिन अंकुलगे, क्राईम संध्या वृतपत्राचे लातूर जिल्हा प्रतिनिधी प्रा. शंकर सोनवणे, शहर प्रतिनिधी अमर करकरे आणि कु.राखी राम पाटोळे यांची उपस्थिती होती.



- क्राईम संध्या दैनंदिन डायरीचे २०२१ चे विमोचन करताना औसा तालुक्याचे आमदार मा. श्री. अभिमन्यूजी पवार भाजपाचे युवा नेते संतोषअप्पा मुक्ता, सुभाष जाधव यांच्यासह क्राईम संध्या वृतपत्राचे औसा तालूका प्रतिनिधी शिवाजी मोरे....

- क्राईम संध्या दैनंदिन डायरी २०२१ च्या विमोचनास शुभेच्छा देताना अहमदपूर पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एस.एस.बिर्ला, सपोनि.एच.आर.केदार, पोउपनि. एन.व्ही.जाधव, पोउपनि. नागोराव जाधव, पोउपनि. ई.जी. डक, पोहेकाँ आर.जी.आलापूरे, पोना कैलास चौधरी, पोकॉ.जे.आर.लष्करे यांच्यासह क्राईम संध्या वृतपत्राचे तालूका प्रतिनिधी तोसिफ सय्यद व फिरोज शेख आदी उपस्थित होते.

- क्राईम संध्या डायरी २०२१ चे प्रकाशन विरार येथील ज्येष्ठ समाजसेवक अनंता वामन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फुलवारी समाचारों का हिंदी साप्ताहिकाचे संपादक रमेश पटेल, क्राईम संध्याचे संपादक लक्ष्मणराव पाटोळे, राजरत्न दर्शन साप्ताहिकाचे संपादक राजाराम वाव्हळ, कार्यकारी संपादक गणेश चव्हाण उपस्थित होते. हा कार्यक्रम विरार येथील अनंता पाटील यांच्या निवासस्थानी पार पडला.

- नळेगाव येथे क्राईम संध्या दैनंदिन डायरी- २०२१ च्या विमोचनास शुभेच्छा देताना ग्रामविकास अधिकारि शिंगे एस. एस., माजी उपसरपंच घृणेश्वर मलशेट्टे, सदस्य शाम मुंजाने, माधव मुगे, संजय शिवणगे, दांडे बापुराव क्राईम संध्या वृतपत्राचे चाकूर प्रतिनिधी सुरेश फरकांडे आदी मान्यवर...